POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२५४ ● मुंबई, शुक्रवार, १७ एप्रिल २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## नाशिक बोगस कॉलसेंटर घोटाळ्यात आयपीएस कराळे, पाटील व घार्गे यांचा संबध, हर्षवर्धन सपकाळांचा गौप्यस्फोट

■ **बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

ऑनलाईन फसवणुकीचे प्रकार सगळीकडे जोरात सुरु असून जामतारा रॅकेट यासाठी कुप्रसिद्ध आहे. पण जामतारा प्रमाणेच महाराष्ट्रातही अशा बोगस कॉल सेंटरच्या माध्यमातून जगभरातील नागरिकांना फसवून शेकडो कोटी रुपयांचा गोरखधंदा सुरु आहे, असा गंभीर आरोप करत या प्रकरणात आयपीएस अधिकारी दत्ता कराळे आणि दोन पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील व सोमनाथ घार्गे यांचाही सहभाग असल्याचा गौप्यस्फोट काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. या रॅकेटला मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरचा आशिर्वाद असल्याशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणात बोगस कॉलसेंटर आणि पैशांची हेराफेरी शक्यच नाही, असेही ते पुढे म्हणाले.







आधीही तीच गोष्ट घडली

'सीबीआय या प्रकरणाचा तपास करत आहे. राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस या प्रकरणाची सीबीआयकडून माहिती घेऊन उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का? का नेहमीप्रमाणे क्लीन चिट देणार?' असा रोकडा सवाल हर्षवर्धन सपकाळ यांनी विचारला आहे. 'याआधीही कराळेंसह दोन्ही अधिकारी ठाणे पालघर आणि रायगड जिल्ह्यांमध्ये कार्यरत होते. तेव्हा हे कॉल सेंटर तिथे सुरु होते. पोलिसांनी या कॉलसेंटरवर छापा टाकला आणि नंतर संदीप सिंह, विशाल यादव या आरोपींना जुजबी कारवाई करून सोडून दिले. या तिन्ही अधिकाऱ्यांची नाशिक परिक्षेत्रात बदली झाल्यावर या आरोपींना हाताशी धरून कॉल सेंटर सुरु करण्यात आल्याची माहिती मिळत आहे. विशेष हे म्हणजे हे सर्व आरोपी ठाणे, रायगड आणि पालघर परिसरातील रहिवाशी आहेत. पूर्वी या तिन्ही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची पदस्थापना याच भागात होती. बोगस कॉलसेंटरही याच भागात सुरु होते.' अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

माहिती असूनही कारवाई का नाही?

'सीबीआय मुंबईच्या ॲंटी करप्शन ब्रँचचे अधिक्षक अमित वसावा यांनी 11 सप्टेंबर 2025 रोजी दाखल केलेल्या एआयआरमधील नोंदीनुसार हे बोगस कॉल सेंटर सुरळीत चालू देण्यासाठी आरोपी गणेश कामनकर आणि त्याच्या भाऊ हे वरिष्ठ अधिकाऱ्यांना मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, सोने आणि क्रिप्टो करन्सीच्या रुपात लाभ (लाच) देत होते. राज्य सरकारला याची संपूर्ण माहिती असतानाही या अधिकाऱ्यांवर अद्याप कारवाई का केली नाही ? याचे उत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी द्यावे,' अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी केली.

अशोक खरात प्रकरणाशी संबध?

'या रॅकेटचा पदार्फाश करताना भोंदूबाबा अशोक खरात- आयपीएस दत्ता कराळे आणि बोगस रॅकेटमधून होणारा पैशाचा काळा धंदा या सर्वांची चौकशी होणे गरजेचे आहे. अशोक खरात प्रकरणात जो पैशाचा व्यवहार झाला, तो पैसा कोणाचा? हे बोगस कमाल सेंटर रॅकेट आणि अशोक खरात यांचे काय लागेबांधे आहेत? या कॉलसेंटरच्या माध्यमातून काळा पैसा पांढरा केला का? तसेच तो पैसा कोणाचा? आयपीएस दत्ता कराळे आणि त्यांचे दोन सहकारी पोलीस अधिक्षक यांची जिथे बदली होते, तिथे तिथे अशाच पद्धतीने बोगस कॉल सेंटरच्या माध्यमातून गोरखधंदा चालवायचे. या सर्वांची सखोल उच्चस्तरीय चौकशी करून आणि दोषींवर कठोर कारवाई करावी,' अशी मागणीही सपकाळ यांनी केली आहे.

### महाराष्ट्र पोलीस काय करत होते?

गांधी भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, 'भोंदूबाबा अशोक खरात याच्याशी आयपीएस अधिकारी आणि सध्या नाशिकचे डीआयजी दत्ता कराळे यांचे संबंध असल्याचे व्हिडीओ नुकतेच प्रसार माध्यमांमध्ये दिसले. हे दत्ता कराळे आणि पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील व सोमनाथ घार्गे या दोघांचाही या बोगस कॉल सेंटरच्या रॅकेटशी संबंध असल्याची माहिती आम्हाला मिळाली आहे. सीबीआयने दिनांक 8 ऑगस्ट 2025 आणि 11 सप्टेंबर 2025 रोजी नोंदवलेल्या एफआयआर नुसार नाशिक तसेच इगतपुरी येथे छापे टाकून बोगस कॉलसेंटर रॅकेट चालवणाऱ्यांना अटक केली. सीबीआयला इगतपुरीत सुरु असलेल्या बोगस कॉल सेंटरची माहिती मिळाली आणि कारवाई करण्यात आली. पण बोगस कॉलसेंटरचा सुगावा महाराष्ट्र पोलीसांना का लागला नाही? महाराष्ट्र पोलीस काय करत होते? हे प्रश्न उपस्थित होतो.' असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला.

## महाराष्ट्रात पाईप गॅसची सुविधा घरोघरी पोहोचवण्यासाठी राज्य शासनाचे प्रयत्न जोरात



**२४ तास हेल्पलाईन :**
ग्राहकांच्या अडचणी सोडवण्यासाठी आणि माहिती देण्यासाठी कंपन्यांना २४ तास हेल्पलाईन सुरू ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शहरांची लोकसंख्या आणि अर्जांचा ओघ लक्षात घेऊन हेल्पडेस्कची संख्या वाढवण्यासही सांगण्यात आले आहे. महापालिका आयुक्त आणि जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी या कामाचा वेळोवेळी आढावा घ्यावा, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. जोपर्यंत जागतिक परिस्थिती पूर्ववत होत नाही, तोपर्यंत हे आदेश लागू राहतील. वॉर्डनिहाय केंद्रे वाढवून जास्तीत जास्त जोडण्या देण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे, जेणेकरून स्वयंपाकाच्या गॅससाठी निर्माण होणारी टंचाई दूर करता येईल.

■**मुंबई। प्रतिनिधी,**

आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे उद्भवलेल्या ऊर्जा संकटाचा सामना करण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. इस्रायल-इराण संघषार्चा जागतिक पुरवठा साखळीवर मोठा परिणाम झाला असून, परिणामी द्रवीभूत पेट्रोलियम गॅसच्या (एलपीजी) उपलब्धतेवर मयार्दा आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, पयार्यी व्यवस्था म्हणून राज्यात 'सिटी गॅस डिस्ट्रिब्युशन' (सीजीडी) नेटवर्कचा विस्तार अधिक वेगाने करण्याचा धोरणात्मक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यासाठी पाईप गॅस (पीएनजी) घराघरांत पोहोचवण्यासाठी नवीन मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

या मोहिमेला गती देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात सीजीडी कंपन्यांना 'जिल्हास्तरीय समन्वय अधिकारी' (नोडल अधिकारी) नियुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हे अधिकारी गॅस पाईपलाईनच्या कामाचा साप्ताहिक प्रगती अहवाल 'ए ते जी' या विहित नमुन्यात राज्यस्तरीय समन्वयकांना सादर करतील. गॅस पाईपलाईनची लांबी आणि जोडणीची टक्केवारी याचा सविस्तर तपशील दर सोमवारी दुपारी १ वाजेपर्यंत सरकारला सादर करणे आता बंधनकारक असेल.

नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार, नोंदणीकृत तसेच प्रस्तावित गृहनिर्माण संस्थांकडून (हाऊसिंग सोसायट्या) पीएनजी जोडणीसाठी अर्ज स्वीकारले जाणार आहेत. वैयक्तिक इमारतींमधील रहिवासी सामूहिक किंवा वैयक्तिक स्वरूपात अर्ज करू शकतील. नागरिकांच्या सुविधेसाठी ऑनलाइन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतींनी अर्ज स्वीकारण्याच्या सूचना कंपन्यांना देण्यात आल्या आहेत.

## आखातातील युद्धाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला फटका!

### स्मारकाचं काम रखडण्याची शक्यता

इंदू मिलमधील बाबासाहेबांच्या स्मारकावरून सुप्रिया सुळेंनीही सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. पक्ष फोडायला वेळ आहे, मात्र बाबासाहेबांच्या स्मारकासाठी वेळ नसल्याचं म्हणत सुप्रिया सुळेंनी राज्य सरकारवर टीका जोरदार टीका केली आहे. आखाती युद्धामुळे तांबे आणि एलपीजीची टंचाई निर्माण झाली आहे, याचा फटका आता 'दादर'च्या 'इंदू मिल'मध्ये साकारल्या जाणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आतंरराष्ट्रीय स्मारकाला बसतोय. तांबे आणि एलपीजीच्या टंचाई आणि दरवाढीमुळे हा प्रकल्प आणखी वर्षभर रखडण्याची शक्यता आहे असे सांगण्यात आले आहे.





■**मुंबई। प्रतिनिधी,**

अमेरिका-इस्त्रायल आणि इराणमधील युद्धाचा फटका आता थेट डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला बसलाय, युद्धामुळे तांबे आणि एलपीजीची टंचाई निर्माण झाली असून किंमतीमध्ये देखील वाढ झाली आहे. या महागाईचा फटका इंदू मिलमध्ये साकारल्या जाणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाला बसत आहे. त्यामुळे हा प्रकल्प आणखी वर्षभर रखडण्याची शक्यता आहे असे सांगितले जात आहे, दरम्यान युद्ध आणि स्मारकाचा संबंध काय? असा सवाल करत संजय राऊतांनी सरकारला केला आहे. तर याला प्रत्युतर देत मविआच्या काळामध्ये विटही रचण्यात आली नव्हती विटही रचण्यात आली नव्हती असं म्हणत नवनाथ बन यांनी राऊतांवर पलटवार केला आहे.

**स्मारकाचं काम पूर्ण होईल – साटम**

विरोधकांनी स्मारकावरून सरकारवर केलेल्या टीकेनंतर अमित साटम यांनी उत्तर दिलं आहे. भाजप नेते अमित साटम यांनी दोन वर्षात इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाचं काम पूर्ण होईल असं सांगितल आहे. तर दुसरीकडे बाबासाहेब आंबेडकरांचं स्मारक बनवू नका असं विधान सुजात आंबेडकर यांनी केलं. त्याऐवजी रिसर्च सेंटर उभारण्याची मागणी त्यांनी केली आहे.

मागील अनेक वर्षांपासून इंदू मिल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाचं काम सुरू आहे. मात्र, आता आखातातील युद्धाचा स्मारकाच्या कामावर परिणाम झाला आहे असे सांगितले जात आहे. धातू ओतकामात एलपी वापरला जातो. आखाती युद्धामुळे तांबे आणि एलपीजीची देशात टंचाई असून दोन्हींचे दरही वाढले, त्यामुळे स्मारकाचं काम रखडण्याची शक्यता आहे.

## ऑनलाइन गेमिंगच्या नावाखाली फसवणूक करणाऱ्या 'ॲप क्रिक-कोड' टोळीचा पदार्फाश

■**वसई। प्रतिनिधी,**

ऑनलाइन गेमिंगच्या माध्यमातून लोकांना झटपट पैसे कमावण्याचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या क्रिक-कोड नावाच्या ॲपशी संबंधित टोळीचा नालासोपाऱ्यात पदार्फाश झाला आहे. विरार क्राइम ब्रांचने केलेल्या कारवाईत या प्रकरणातील चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. नालासोपाऱ्यात ऑनलाइन फसवणुकीचा मोठा प्रकार उघडकीस आला आहे. विरार क्राइम ब्रांच (युनिट 3) ला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे म्हाडा कॉलनीतील एका इमारतीवर छापा टाकण्यात आला. येथेच आरोपींनी आपला 'कंट्रोल रूम' तयार करून लोकांना फसवण्याचे जाळे उभे केले होते. 'क्रिक-कोड' नावाच्या ॲपद्वारे आरोपी लोकांना ऑनलाइन गेमिंगमध्ये गुंतवून मोठा नफा मिळेल असे सांगत होते. सुरुवातीला थोडा फायदा दाखवून नंतर मोठ्या रकमेची गुंतवणूक करण्यास भाग पाडले जात होते. त्यानंतर मात्र संबंधित व्यक्तीशी संपर्क तोडून त्यांची फसवणूक केली जात होती. पोलिसांनी केलेल्या कारवाईत आरोपींकडून 10 मोबाईल फोन, 3 लॅपटॉप, 70 ते 80 एटीएम कार्ड, तसेच मोठ्या प्रमाणात चेकबुक आणि बँक पासबुक जप्त करण्यात आले आहेत. याशिवाय क्रिक-कोड ॲपशी संबंधित डिजिटल डेटा देखील पोलिसांच्या हाती लागला आहे. या प्रकरणात चंदन झा, विकास विश्वकर्मा, यशपाल मिश्रा आणि सचिन रवणे यांना अटक करण्यात आली आहे. हे सर्व आरोपी तांत्रिकदृष्ट्या पारंगत असून त्यांनी आधुनिक पद्धतीने फसवणुकीचे जाळे उभारले होते. पोलीस आता या आरोपींच्या बँक खात्यांची आणि व्यवहारांची सखोल चौकशी करत आहेत. या प्रकरणात आणखी काही लोकांचा सहभाग असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## त्र्यंबकेश्वर मंदिरात ३००० रुपयांत 'व्हीआयपी' दर्शनाचा काळाबाजार

### शरद पवार गटाचा नेता गजाआड

■**भाईंदर। प्रतिनिधी,**

बारा ज्योतिर्लिंगांपैकी महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असलेल्या त्र्यंबकेश्वर मंदिराच्या पावित्र्याला काळिमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. तासनतास रांगेत उभ्या असलेल्या भाविकांना अवघ्या १० मिनिटांत दर्शन घडवण्याचे आमिष दाखवून ३ हजार रुपये उकळणाऱ्या एका टोळीचा नाशिक ग्रामीण पोलिसांनी पदार्फाश केला आहे. या प्रकरणात धक्कादायक वळण म्हणजे, या गैरव्यवहाराचे धागेदोरे थेट देवस्थान ट्रस्टच्या प्रशासनापर्यंत पोहोचले आहेत. पोलिसांनी याप्रकरणी सखोल तपास करून देवस्थानचे विश्वस्त आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नेते पुरुषोत्तम कडलग यांच्यासह गोटीराम पेहरे यांना अटक केली आहे. भाविकांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेऊन आर्थिक लूट करणाऱ्या या प्रकारामुळे परिसरात आणि भाविकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.



**विश्वस्त निवड प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह?**

आता त्र्यंबकेश्वर देवस्थानच्या विश्वस्त निवड प्रक्रियेवरच गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. देवस्थानच्या माजी विश्वस्त ललिता शिंदे यांनी या संदर्भात अत्यंत स्फोटक आरोप केला असून, या घोटाळ्याची पाळेमुळे खोलवर असल्याचे संकेत दिले आहेत. शिंदे यांनी दावा केला आहे की, "देवस्थानच्या विश्वस्त निवडीतच मोठा आर्थिक व्यवहार झाला असून, अटक करण्यात आलेल्या कडलग यांच्यासह अन्य तिघांनी कोट्यवधी रुपये देऊन हे मानाचे पद मिळवले आहे." केवळ भाविकांची लूट हाच एक मुद्दा नसून, मुळात या नियुक्त्या कशा झाल्या याची सखोल चौकशी होणे गरजेचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या आरोपामुळे देवस्थान प्रशासन आणि विधी व न्याय विभागाच्या कार्यपद्धतीवर आता संशयाची सुई वळली असून, संपूर्ण प्रक्रियेच्या फेरचौकशीची मागणी जोर धरत आहे.

**पोलिसांचे धडाकेबाज 'स्टिंग ऑपरेशन'**

गेल्या काही दिवसांपासून त्र्यंबकेश्वर मंदिरात सशुल्क दर्शनाचा काळाबाजार सुरू असल्याच्या तक्रारी पोलीस प्रशासनाकडे प्राप्त होत होत्या. या तक्रारींची गांभीयार्ने दखल घेत नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी एक विशेष 'स्टिंग ऑपरेशन' यशस्वीरीत्या राबवले. या मोहिमेत स्वतः पोलीस कर्मचारीच साध्या वेशात भाविक बनून मंदिरात गेले होते. यावेळी केवळ एका दिवसात तीन वेगवेगळ्या भाविकांकडून जलद दर्शनासाठी प्रत्येकी ३ हजार रुपये वसूल केले जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले. पोलिसांनी पुराव्यासह या लुटीचा पदार्फाश केला असून, एका एजंटला रंगेहात पकडले. या एजंटच्या चौकशीतून या संपूर्ण रॅकेटचे कनेक्शन थेट देवस्थानचे विश्वस्त पुरुषोत्तम कडलग यांच्याशी असल्याचे स्पष्ट झाले.

**७ दिवसांची पोलीस कोठडी**

पुरुषोत्तम कडलग यांना नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या निकालामुळे देवस्थान वतुर्ळात मोठी खळबळ उडाली असून, प्रकरणाच्या सखोल तपासाचा मार्ग मोकळा झाला आहे. न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान सरकारी वकिलांनी जोरदार युक्तिवाद केला. "त्र्यंबकेश्वर हे जागतिक स्तरावरील देवस्थान असून, विश्वस्त पदाचा गैरवापर करून हे रॅकेट चालवले जात असल्याचा दाट संशय आहे. या कटात अजून कोणाचे हात गुंतले आहेत, हे शोधण्यासाठी १० दिवसांच्या कोठडीची गरज आहे," असे त्यांनी नमूद केले. बचाव पक्षाच्या वकिलांनी हे आरोप फेटाळून लावण्याचा प्रयत्न केला, मात्र उपलब्ध पुरावे आणि प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन न्यायालयाने आरोपींना पोलीस कोठडीत पाठवण्याचे आदेश दिले.

**त्र्यंबकेश्वर दर्शन घोटाळ्यावरून राजकीय आरोप-प्रत्यारोप**

या प्रकरणातील मुख्य आरोपी पुरुषोत्तम कडलग हे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे युवक कार्याध्यक्ष असल्याने विरोधकांनी यावरून पक्षाच्या विचारधारेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. भाजप आध्यात्मिक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष तुषार भोसले यांनी या कारवाईनंतर आक्रमक पवित्रा घेत थेट शरद पवारांवर निशाणा साधला. "शरद पवारांच्या मार्गदर्शनाखाली नास्तिक विचारांचे कार्यकर्ते तयार झाल्यामुळेच आज पवित्र देवस्थानांमध्ये भ्रष्टाचाराचा बाजार मांडला जात आहे," अशी टीका भोसले यांनी केली. विश्वस्त पदावर बसून भाविकांची लूट होणे हे अत्यंत दुर्दैवी असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. कडलग यांच्या अटकेमुळे सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आता आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात आहेत.

## अमरावतीत १८० तरुणींचे लैंगिक शोषण

### आरोपी मोहम्मद अयाजला ठोकल्या बेड्या... ३५० अश्लील व्हिडीओ व्हायरल

**आरोपी 'एमआयएम'चा कार्यकर्ता - अनिल बोंडे**

परतवाडा पोलिसांनी अश्लील व्हिडीओप्रकरणी ताब्यात घेतलेला युवक ह्यएमआयएमह्णचा कार्यकर्ता असल्याचा खळबळजनक आरोप खासदार अनिल बोंडे यांनी केला असून, हे केवळ एका व्यक्तीचे कृत्य नसून यामागे एक मोठी टोळी सक्रिय असल्याचा दावा त्यांनी केला आहे. या टोळीने स्नॅपचॅट आणि व्हॉट्सॲपवर ग्रुप्स तयार करून हे जाळे पसरवले असल्याचे सांगत, पोलिसांनी संबंधित आरोपींचे मोबाईल जप्त करून त्यांच्या कॉल डिटेल्सची आणि संपकार्ची सखोल चौकशी करावी, अशी आग्रही मागणीही बोंडे यांनी यावेळी केली आहे.



अमरावतीच्या परतवाडा मध्ये मुलींच्या लैंगिक शोषणाचा आरोप असलेला मोहम्मद अयाज मोहम्मद तन्वीरचा मोबाईल पोलिसांनी ताब्यात घेतला. आरोपीच्या मोबाईलमध्ये त्याचे 7 ते 8 तरुणी सोबत फोटो आणि व्हिडिओ आहेत. हे अश्लील व्हिडिओ आरोपीने व्हायरल केले की त्याच्या मित्राने व्हायरल केले हे मोबाईल तपासातून समोर येणार आहे. पीडित महिला ना आवाहन केलं आहे पुढं यावं. सायबरकडून माहिती घेतली जात आहे. पीडित महिलांची ओळख गुप्त ठेवली जाईल. आम्ही हेल्पलाईन नंबर दिले आहे. पालकानी पुढं यावं. भीती न बाळगता समोर यावं. कोणाचही नाव समोर येऊ देणार नाही. प्रकरणात आणखी आरोपी असतील तर तपास करू, अशी माहिती पोलीस निरीक्षक सुरेश मस्के यांनी दिली.

■**अमरावती। प्रतिनिधी,**

नाशिकच्या भोंदूबाबा अशोक खरातचे प्रकरण ताजे असतानाच, अमरावती जिल्ह्यातही मोहम्मद अयाज मोहम्मद तनवीर या तरुणाने सुमारे १८० मुलींचे लैंगिक शोषण केले असल्याच्या आरोपाने मोठी खळबळ उडाली आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत पोलिसांनी आरोपीवर गुन्हा दाखल करून त्याला तातडीने अटक केली. त्याला न्यायालयात हजर केले असता २१ एप्रिलपर्यंत सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. या धक्कादायक प्रकरणाचा अधिक तपास आता पोलिस यंत्रणेमार्फत केला जात आहे.

अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथे अनेक तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून, त्यांचे लैंगिक शोषण केल्याच्या आणि त्यानंतर ब्लॅकमेल करून अत्याचार केल्याच्या गंभीर आरोपाखाली मोहम्मद अयाज मोहम्मद तनवीर या संशयित आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणात भाजप खासदार अनिल बोंडे यांनी संबंधित आरोपीने तब्बल १८० तरुणींचे शोषण करून त्यांचे ३५० व्हिडिओ व्हायरल केल्याचा धक्कादायक आरोप केला. त्यानंतर पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवत ही कारवाई केली असून, या खळबळजनक प्रकरणाचा अधिक तपास सध्या सुरू आहे.

अनिल बोंडे म्हणाले, या प्रकरणात काही मुस्लिम आणि हिंदू समाजाच्या मुली देखील आहेत. हे जाळे खूप मोठे पसरलेले आहे आणि चिखलदरा हॉटेलमधील पोलिसांनी सीसीटीव्ही जप्त करून सहा महिन्यांतील फुटेज तपासले तर त्या आधारे रॅकेट उघड होऊ शकते. पोलिसांनी या प्रकरणाच्या खोलात जायला हवे आणि महिला अधिकारी आणि सायबर मधील अधिकारी यांची नेमणूक केली पाहिजे, अशी मागणी देखील बोंडे यांनी केली आहे.

दरम्यान, पोलिसांनी आरोपीचा मोबाईल जप्त करून तपास सुरू केला असून, त्यामध्ये अनेक धक्कादायक अश्लील व्हिडिओ असल्याचे समजते. हे व्हिडिओ आरोपीने आपल्या मित्रांना पाठवले आहेत का, याचा शोध घेतला जात असतानाच त्याचे तरुणींसोबतचे काही अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर आधीच व्हायरल झाले आहेत. आरोपीने पुराव्यांचा नाश करण्यासाठी मोबाईलमधील मोठा डेटा डिलीट केला असला तरी, सायबर तज्ज्ञांच्या मदतीने तो रिकव्हर करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## युद्ध विरामालाच विराम?



**शस्त्रबंदीमुळे तेल आयातीवर अवलंबून असणारी भारतासारखी अनेक राष्ट्रे सुखावली. श्रेय कोणीही घ्या, पण युद्ध एकदाचे थांबू द्या, असा सूर गेल्या काही दिवसांपासून तेल आयातीला अवलंबित्व असणाऱ्या राष्ट्रांकडून उघडपणे आळविला जात होता. या युद्धाची जितकी किंमत युद्धामध्ये सहभागी असणाऱ्या अमेरिका, इस्त्रायल, इराण या तीन राष्ट्रांना मोजावी लागली नसेल, त्याहून अधिक किंमत तेल आयातदार राष्ट्रांना मोजावी लागली.**

अमेरिका आणि इराण यांच्यात १४ दिवसांकरिता युद्धविराम जाहीर झाला असला, तरी हा विराम क्षणिक ठरण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. कारण त्याला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची सातत्याने बदलणारी भूमिका व युद्ध लढविण्याची इराणची खुमखुमी यामुळे युद्धविराम फार काळ टिकणार नसल्याचे संकेत होते. अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या युद्धविरामाला अवघा एक दिवस लोटत नाही, तोच या युद्धविरामाचे भवितव्य संकटात सापडले. दोन्ही देशांमध्ये पाकिस्तानमधील इस्लामाबाद येथे नियोजित असलेल्या शांतता चर्चेबाबतही अनिश्चितता निर्माण झाली. इराणचे पाकिस्तानमधील राजदूत अमिरी मोगदम यांनी इराणचं शिष्टमंडळ शांतता प्रस्थापित करण्यासाठीच्या चर्चेसाठी पाकिस्तानमध्ये येणार असल्याची माहिती एक्सवरील पोस्टमधून दिली होती. मात्र काही वेळातच त्यांनी ही पोस्ट हटवली. त्यामुळे पुन्हा युद्ध भडकण्याचे संकेत निर्माण झालेत. अमेरिका आणि इराणमध्ये सध्या दोन आठवड्यांचा युद्धविराम सुरू असतानाच, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी पुन्हा एकदा इराणला निर्वाणीचा इशारा दिला. दोन्ही देशांमध्ये अंतिम आणि ठोस करार होत नाही, तोपर्यंत अमेरिकेचे लष्करी बळ इराणच्या सीमांनजीक तैनात राहील. तोपर्यंत आमचे सैन्य माघारी फिरणार नाही, असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे. हा करार यशस्वी झाला नाही, तर इराणवर आतापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला केला जाईल, अशी धमकीही त्यांनी दिली. त्यामुळे युद्धबंदीची घोषणा पुन्हा एकदा नामधारी ठरण्याची शक्यता असून विनाशकारी युद्ध अंतिम क्षणापर्यंत लढले जाणार असल्याचे चित्र निर्माण झाले. अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण या संघर्ष २८ फेब्रुवारीपासून सुरू आहे. बुधवारी १४ दिवसांकरता अमेरिका-इराण या दोन देशांमध्ये शस्त्रसंधी झाली. या शस्त्रसंधीला अमेरिकेचा युद्धातील मित्र इस्रायलने देखील संमती दिली. पाकिस्तानच्या मध्यस्थीने दोन आठवड्यांची शस्त्रसंधी झाल्याचे सांगण्यात आले. या शस्त्रबंदीमुळे तेल आयातीवर अवलंबून असणारी भारतासारखी अनेक राष्ट्रे सुखावली. श्रेय कोणीही घ्या, पण युद्ध एकदाचे थांबू द्या, असा सूर गेल्या काही दिवसांपासून तेल आयातीला अवलंबित्व असणाऱ्या राष्ट्रांकडून उघडपणे आळविला जात होता. या युद्धाची जितकी किंमत युद्धामध्ये सहभागी असणाऱ्या अमेरिका, इस्त्रायल, इराण या तीन राष्ट्रांना मोजावी लागली नसेल, त्याहून अधिक किंमत तेल आयातदार राष्ट्रांना मोजावी लागली आहे. या राष्ट्रांमध्ये भारताचा अपवाद वगळता अन्य राष्ट्रांमध्ये महागाईचा आगडोंब उसळला आहे. ही युद्धबंदी प्रत्यक्षात येणार की केवळ कागदोपत्रीच घोषणा राहणार, यावर प्रश्नचिन्ह कायम आहे. इराण आणि अमेरिका यांच्यात शस्त्रसंधी होताच स्वतःची पाठ थोपटून घेणारा पाकिस्तान आता तोंडावर पडला आहे. युद्धबंदीच्या घोषणेनंतर अवघ्या काही तासांमध्ये इस्रायलने लेबनॉनवर हल्ले केले. मग इराणने यूएई, कुवेतला लक्ष्य केले. शस्त्रसंधीची घोषणा झाल्यावर २४ तासांच्या आत पुन्हा युद्धविषयक घडामोडी सुरूच राहिल्या. हल्ले होतच राहिले. यामुळे पाकिस्तानने घडवून आणलेल्या व छातीचा ढोल करत जगभर दवंडी पिटवलेल्या शस्त्रसंधीचे नेमके काय झाले, असा प्रश्न विचारला जाऊ लागला. पण लेबनॉन या शस्त्रसंधीचा भाग होता की नाही, यावरून सगळा घोळ झाला. मध्यस्थीचा दावा पाकिस्तानने केल्याने आता त्यांची गोची झाली. इस्रायलने त्यांचा शेजारी देश असलेल्या लेबनॉनवरील हल्ले सुरूच ठेवले. त्यामुळे पाकिस्तान तोंडावर आपटला. शस्त्रसंधी सगळ्या ठिकाणी लागू आहे, त्यात लेबनॉनचाही समावेश असल्याचे पाकिस्तानचे पंतप्रधान शरीफ यांनी जाहीरपणे म्हटले होते. १० एप्रिलला इस्लामाबादमध्ये होत असलेल्या बैठकीत या सगळ्या मुद्द्यांवर शिक्कामोर्तब होईल, असा विश्वासही शरीफ यांनी व्यक्त केला. त्यांनी केलेला दावा आणि युद्धबंदीनंतरही सुरू असलेले हल्ले यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर संभ्रम निर्माण झाला. कारण शस्त्रसंधीसंदर्भात इस्रायल आणि अमेरिकेकडून करण्यात आलेली विधाने परस्परविरोधी आहेत. अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी वान्स यांनी शरीफ यांचा दावा स्पष्ट शब्दांत खोडून काढला. 'काहीतरी गैरसमजातून हा प्रकार घडला. लेबनॉनचा समावेश शस्त्रसंधीत असल्याचं इराणला वाटलं असेल. पण आम्ही कधीही तसे आश्वासन दिलेलं नाही. तसे संकेत देखील आम्ही कधी दिले नव्हते,' असे अमेरिकेने स्पष्ट केल्याने पाकिस्तानच्या मध्यस्थीवर प्रश्न उपस्थित झाले. अमेरिकेनं केलेला दावा खोटा असल्याचं पाकिस्तानचं म्हणणं आहे. इराणसोबत झालेल्या शस्त्रसंधीत लेबनॉनच्या मुद्द्याचा समावेश होता, असा दावा अमेरिकेतील पाकिस्तानचे राजदूत रिजवान सईद शेख यांनी केला. लेबनॉनचा विषय शस्त्रसंधीत नव्हताच, असा इस्रायलचाही दावा आहे. अमेरिका, इस्रायलनं घेतलेल्या भूमिकेमुळे मध्यस्थीसाठी स्वतःची पाठ थोपटून घेणाऱ्या पाकिस्तानची आंतरराष्ट्रीय पातळीवर फजिती झाली. युद्ध सुरू झाल्यावर भारतासारख्या अनेक देशांमध्ये इंधन टंचाईचे सावट निर्माण झाले. अनेक उद्योगांवर परिणाम झाला. महाराष्ट्रामध्ये रोजगार-व्यवसायासाठी आलेले परराज्यातील मजूर, कर्मचारी आपल्या राज्यात निघून गेल्याने छोट्या व्यवसायांवर परिणाम झाला. किरकोळ खाद्यपदार्थांच्या गाड्या रस्त्यावरून गायब झाल्या. अनेक हॉटेल्समधील गॅसच्या टाक्या अदृश्य झाल्या. कोळशावर शेगड्या पेटविण्यात आल्या. इंधनाचे दर वाढल्यावर महागाईस पोषक वातावरण निर्माण होते. इंधनाचे दर उतरले तरी महागाई कमी होत नसल्याचा आजवरचा अनुभव आहे. इस्रायल आणि हिजबुल्ला यांच्यातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इराणने पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेतला. जगातील अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या 'होर्मुझच्या सामुद्रधुनी'तून जाणाऱ्या प्रत्येक तेलवाहू जहाजाकडून आता इराण प्रति बॅरल १ डॉलर इतका 'टोल' वसूल करणार आहे. विशेष म्हणजे, हा कर क्रिप्टोकरन्सीच्या माध्यमातून भरावा लागणार. त्यामुळे भारताला महागड्या दराने तेल खरेदी करावं लागणार.

# प्रवासी, कर्मचाऱ्यांच्या जीवावर उठलेली 'बेस्ट' !

समुद्रकिनारा आणि बॉलिवूड ही जशी मुंबईची ओळख आहे तशीच बेस्ट बस ही देखील मुंबईची ओळख आहे. मात्र गेल्या काही वर्षांत सदोष बसगाड्या आणि दुरवस्था झालेले बस डेपो यामुळे बेस्ट उपक्रम प्रवासी व कर्मचारी यांच्या जीवावर उठला आहे.



झंझावात हा एकच शब्द उद्धव ठाकरेंच्या या नितीन नांदगावकर नावाच्या शिलेदारासाठी वापरायला हवा. या पठ्ठ्याने उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या संधीचं सोनं केले आणि बेस्ट कामगार सेना सरचिटणीस आणि बेस्ट समिती सदस्य म्हणून अवघ्या बेस्ट प्रशासनालाच हादरवले. मुंबई कटकारस्थानी राजकारण्यांच्या हातून तेव्हाच वाचेल जेव्हा सगळ्यात आधी बेस्ट सुधारेल आणि बेस्ट तेव्हाच सुधारेल जेव्हा उद्धव ठाकरेंच्या शिवसेना पक्षातील नितीन नांदगावकर यांच्यासारख्या निष्ठावान शिलेदारांना लढण्याची संधी पक्षाकडून देऊन मुक्तहस्त दिला जाईल.

मुंबई ही महानगरी केवळ इमारतींनी, समुद्रकिनाऱ्यांनी किंवा बॉलिवूडने ओळखली जात नाही तर ती ओळखली जाते तिच्या 'बेस्ट'बसमुळे. लाखो सामान्य मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनाचा आधारस्तंभ असलेल्या या बेस्ट उपक्रमावर गेल्या काही महिन्यांत एक राजकीय आणि सामाजिक वादळ घोंघावू लागले आहे. या वादळाचे केंद्रबिंदू आहेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते, बेस्ट कामगार सेनेचे सरचिटणीस आणि बेस्ट समिती सदस्य डॉ. नितीन मधुकर नांदगावकर. डॉ. नांदगावकर हे उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे एक आक्रमक, तडफदार आणि अभ्यासू नेते आहेत. बेस्ट समितीवर त्यांची नियुक्ती झाल्यापासून त्यांनी या उपक्रमाच्या प्रत्येक कोपऱ्यात डोकावण्याचा निर्धार केला. ते केवळ बैठकांमध्ये प्रश्न विचारणारे नेते नाहीत; ते स्वतः डेपोत जातात, बसची पाहणी करतात, कर्मचाऱ्यांशी बोलतात आणि मग प्रशासनावर थेट प्रहार करतात.

### दोषपूर्ण बसचा भस्मासुर

डिसेंबर २०२४ मध्ये कुर्ला परिसरात एक बेस्ट इलेक्ट्रिक बस अनियंत्रित होऊन पादचाऱ्यांना धडकली. सहा जण ठार झाले, ४९ जखमी झाले. मानवी चुकीचा संशय असला, तरी यामागे एक मोठी व्यवस्थात्मक समस्या दडलेली होती आणि ती म्हणजे बेस्ट चालकांना इलेक्ट्रिक बस चालवण्याचे कोणतेही प्रात्यक्षिक प्रशिक्षण मिळाले नव्हते! मुंबई उच्च न्यायालयाने हे वास्तव 'धक्कादायक' म्हणून नोंदवले. डिसेंबर २०२५ मध्ये भांडुप परिसरात एक बेस्ट मिनी बस स्टेशनजवळ पादचाऱ्यांना धडकली. चार जण मृत्युमुखी पडले, नऊ जण जखमी झाले. मार्च २०२६ मध्ये कुर्ल्याच्या बर्वे मार्गावर एक बेस्ट बस वाहनांना धडकली. सात जण ठार, ४२ जखमी. या अपघातांची मालिका पाहता, नांदगावकरांनी एक गोष्ट स्पष्टपणे ओळखली. हे केवळ दुर्दैवी अपघात नाहीत, तर हे एक प्रणालीचे अपयश आहे. नांदगावकरांनी बेस्ट प्रशासनाला सादर केलेल्या याचिकेत त्यांनी दोन खासगी बस कंत्राटदारांशी संबंधित कागदोपत्री पुरावे सादर केले. एका प्रकरणात आठ बसमध्ये दोष आढळले, तर दुसऱ्या प्रकरणात पाच वेट लीज बसमध्ये गंभीर त्रुटी होत्या. ते दोष कोणते होते? स्टिअरिंग लॉकच्या गंभीर समस्या, ब्रेक निकामी होण्याचा धोका, ब्रेक लायनरच्या त्रुटी, ड्रॅग लिंक असेंब्लीतील दोष, गिअर बॉक्सचे नुकसान, सुरक्षा उपायांचा पूर्ण अभाव आणि अत्यंत खराब देखभाल. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे जानेवारी आणि फेब्रुवारी २०२६ मध्ये ओळखले गेलेले दोष मार्च महिन्यात पुन्हा तपासणी केल्यावर 'अटेंड नॉट डन' म्हणजेच दुरुस्त न केलेले आढळले. काही प्रकरणांमध्ये, बस 'दुरुस्त' झाल्याचे दाखवून कागदोपत्री नोंदी केल्या गेल्या, परंतु प्रत्यक्षात दोष तसेच राहिले. नांदगावकरांनी हा प्रकार उघड करताना ठणकावून सांगितले, "जर स्टिअरिंग किंवा ब्रेक निकामी झाले, तर चालक वाहनावरील नियंत्रण गमावेल. परिणामी अपघात होईल. प्रश्न असा आहे की, आपण हे अपघात घडण्याची वाट पाहत आहोत का?"

### डेपोंचे भयावह वास्तव

नांदगावकरांनी मुंबईतील २७ बेस्ट डेपोंची पाहणी केली. मुलुंड पश्चिम डेपोमध्ये त्यांनी जे पाहिले ते थरारक होते. छताचे स्लॅब कोसळण्याच्या उंबरठ्यावर, भिंतींना मोठ्या भेगा, कमकुवत रचना, आजूबाजूला वाढलेले गवत, अस्वच्छ आणि धोकादायक विश्रांतीची जागा. अहवालात साप आढळल्याचेही नमूद केले. बांद्रा पश्चिम डेपोत तर परिस्थिती आणखी गंभीर होती. छत धरून ठेवण्यासाठी काँक्रीटचे तुकडे खाली पडू नयेत म्हणून वायर मेश लावण्यात आली होती. जवळपास ३०० कर्मचारी रोज या धोकादायक परिस्थितीत काम करतात. डॉक्टरांचे केबिन, कर्मचाऱ्यांची विश्रांतीची खोली सर्व काही जर्जर अवस्थेत. नांदगावकरांनी भिंतीतून काँक्रीटचा तुकडा हाताने बाहेर काढला आणि माध्यमांसमोर धरला आणि ही त्यांची कृती हजारो शब्दांपेक्षा जास्त बोलणारी ठरली. त्यांनी विचारले, "ज्या चालकांवर मुंबईकरांचे जीव अवलंबून आहेत, त्यांचे जीव धोक्यात असणे हे कोणाला चालते? हे क्रौर्य आहे." विक्रोळी डेपोतही या शिवसेना कार्यकर्त्याने सुरक्षा जोखमी निदर्शनास आणल्या. कर्मचारी धोकादायक परिस्थितीत काम करत असल्याचे स्पष्ट झाले. डेपोतील कर्मचाऱ्यांनी नांदगावकरांशी बोलताना आपली व्यथा मांडली. एका बसचालकाने सांगितले, "आम्ही रोज कामावर येतो, पण छतावरून काहीतरी पडेल का याची भीती असते. मेश हेच एकमेव संरक्षण आहे. पर्याय नाही, म्हणून काम करतो." एका वाहकाने सांगितले, "कधी कधी काँक्रीटचे छोटे तुकडे खरोखरच पडतात. आता हे सामान्य झाले आहे." नांदगावकर यांनी सूचना केल्यावर बेस्ट प्रशासनही जागे झाले.

### सुरक्षारक्षकांची ३२१ रिक्त पदे!

नांदगावकर केवळ बस आणि डेपो यापुरते मर्यादित राहिले नाहीत. त्यांनी बेस्ट उपक्रमातील सुरक्षा आणि दक्षता विभागात तब्बल ३२१ सुरक्षारक्षकांच्या जागा रिक्त असल्याचे निदर्शनास आणले. २०१६ पासून महापालिकेच्या अखत्यारित असल्याने स्वमालकीच्या बस घेण्याचे उपक्रमाने थांबवले, कर्मचारी भरती बंद केली गेली. नांदगावकरांनी बेस्ट समिती अध्यक्षा तृष्णा विश्वासराव यांच्याकडे तातडीने सुरक्षारक्षक भरती करण्याची मागणी केली. परिणामी, २३ मार्च २०२६ रोजी समिती अध्यक्षांनी संबंधित अधिकारी वर्गाला भरती प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे आदेश दिले.

### बेस्टच्या मालमत्ता ढापण्याला विरोध

मार्च २०२६ मध्ये बेस्टने आपल्या १० मालमत्ता व्यावसायिक भाडेतत्त्वावर देण्याचा प्रस्ताव मांडला. कांदिवली, अंधेरी, वडाळा, मुंबई सेंट्रल, घाटकोपर आणि गोरेगाव येथील मालमत्तांचा यात समावेश होता. वार्षिक भाडे कोट्यवधींमध्ये अपेक्षित होते. नांदगावकरांनी या प्रस्तावावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. बेस्टने व्यावसायिक दराने भाडे आकारले पाहिजे. त्यांनी बंद बिडिंग प्रक्रियेऐवजी खुली लिलाव पद्धत वापरण्याची मागणी केली, जेणेकरून पारदर्शकता येईल आणि उपक्रमाला जास्तीत जास्त उत्पन्न मिळेल.

### प्रशासनावरील थेट प्रहार

नांदगावकरांनी वेट लीज बस ऑपरेटर्सना उत्तरदायित्वाच्या कक्षेत आणण्यासाठी ठोस मागण्या केल्या. प्रत्येक बस रस्त्यावर उतरण्यापूर्वी अभियांत्रिकी विभागाची लेखी परवानगी बंधनकारक असावी. नियमित रस्ते योग्यता तपासणी व्हावी. आरटीओमार्फत वार्षिक तंदुरुस्ती चाचण्या व्हाव्यात. दोषी कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी. डेपोंसाठी संरचनात्मक तपासणी तातडीने व्हावी. देखभाल दुरुस्ती जलद गतीने व्हावी. कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित कामाची परिस्थिती निर्माण करावी. व्यापक पातळीवर उच्चस्तरीय स्वतंत्र चौकशी व्हावी. कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी. सर्व कंत्राटी बसचे तातडीचे सुरक्षा ऑडिट व्हावे. अभियांत्रिकी मंजुरीशिवाय कोणतीही बस रस्त्यावर धावू नये. नांदगावकरांच्या या सातत्यपूर्ण आणि आक्रमक लढ्याचे परिणाम दिसू लागले आहेत. बेस्ट महाव्यवस्थापक सोनिया सेठी यांनी युद्धपातळीवर तीव्र तपासणी मोहीम राबवण्याचे निर्देश दिले. वाहतूक विभागाच्या तपास पथकाकडून एका आठवड्याच्या आत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. बेस्ट समिती अध्यक्षा तृष्णा विश्वासराव यांनी ६ एप्रिल रोजी अधिकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावली. त्या म्हणाल्या, दोषपूर्ण बस रस्त्यावर धावणे खपवून घेणार नाही. प्रवाशांना आणि पादचाऱ्यांना धोक्यात टाकणे आम्ही मान्य करणार नाही. सुरक्षारक्षक भरती प्रक्रिया सुरू झाली. बेस्टने मालमत्ता विकास योजनेत सुधारणा करण्याचे संकेत दिले.

### विरोधाभास आणि अटेंड नॉट डन?

बेस्टच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मात्र आपली बाजू मांडताना सांगितले की, सर्व वेट लीज बसची डेपोमध्ये नियमितपणे अचानक तपासणी केली जाते. स्टिअरिंग, ब्रेकिंग, टायर्स, सस्पेंशन, विद्युत प्रणाली सर्वांची तपासणी होते. कोणताही दोष आढळल्यास तातडीने सुधारणात्मक कारवाई केली जाते. परंतु नांदगावकरांनी ठेवलेले कागदोपत्री पुरावे वेगळी गोष्ट सांगतात. ह्यअटेंड नॉट डनह्ण या शब्दांनी भरलेल्या तपासणी अहवालांनी प्रशासनाच्या दाव्यांना छेद दिला आहे. नांदगावकरांचा हा लढा केवळ एका पक्षाच्या विरोधाचा भाग नाही. हा लढा आहे मुंबईच्या लाखो सामान्य प्रवाशांसाठी, ज्यांना रोज या बसवर विश्वास ठेवावा लागतो. हा लढा आहे त्या चालकांसाठी आणि कर्मचाऱ्यांसाठी, ज्यांना धोकादायक गाड्या चालवायला आणि जर्जर डेपोत काम करायला भाग पाडले जाते. बेस्ट उपक्रम ही मुंबईची दुसरी जीवनरेखा आहे. पहिली उपनगरी रेल्वे. परंतु ती जीवनरेखा जर दोषपूर्ण बसगाड्यांनी बनलेली असेल, जर ती जर्जर डेपोत श्वास घेत असेल, तर मुंबईकरांचे जगणे धोकादायक बनते. बेस्टच्या भल्यासाठी हा झंझावात थांबणे योग्य नाही. तो अधिक तीव्र व्हायला हवा.

## अहिंसा परमो धर्मः

परचक्र तेव्हाही होतं आणि आजही आहे. हिंसा तेव्हाही होती आणि आजही आहे. दुःखाचं चक्रव्यूह भेदता येत नाही. चिंध्यांच्या बाहुल्या नसतात, कोवळ्या मुली असतात शाळेत जाणाऱ्या. झाडं तोडली काय अन् शाळेवर बॉम्ब फेकला काय, चिवचिव मात्र कायमची थांबते. आपण केवळ अहिंसेच्या देवाचा धावा करू शकतो. आपल्याकडे निखळ भक्ती तरी कुठे आहे? प्रेम कुठे आहे? परदुःखानं व्यथित होणारं मन कुठे आहे? म्हणून पदोपदी तुकोबा आठवतात.

**संवसारे जालो अति दुःखे दुःखी,**
**मायबाप सेखी क्रमिलिया,**
**दुष्काळे आटिले द्रव्य नेला मान,**
**स्त्री एकी अन्न अन्न करिता मेली...**

मृत्यू सारखा पाठलाग करीत असताना देवाचा ध्यास त्यांनी सोडला नाही. कुटुंब, गाव, प्रदेश, सर्वत्र मरणसावल्या पसरलेल्या; परंतु विठू माउलीची तीव्र ओढ होती. विरक्तीचा पिंड होता. मायेच्या विराट चक्रातून बाहेर पडायचं होतं. बाइल मेली मुक्त जाली, देवे माया सोडविली, पोर मेले बरे झाले, देवे मायाविरहित केले, माता मेली मज देखता, तुका म्हणे हरली चिंता... समाजासाठी हिताची गोष्ट सांगायची होती म्हणून वैयक्तिक दुःखाचा डोंगर काळजाआड दडवला त्यांनी. विरक्ती, भक्ती आणि नैतिकता होती म्हणून तुकोबांनी मुक्तीचा अनुपम्य सोहळा अनुभवला. अहंकाराचा वारा लागू दिला नाही. विशेषत्वाला कायम नकार दिला. सामान्यत्व स्वीकारलं. नम्रता अंगीकारली. निःस्वार्थ सेवा केली. निरपेक्ष भक्ती केली. मोहाचे धागे स्वहस्ते तोडले. 'मी'चं विसर्जन केलं. मग मी-तू पणाची बोळवण झाली. स्वतःकडे पाहतो, भोवतालाकडे पाहतो आणि तुकोबांच्या अलौकिक व्यक्तित्त्वाकडे पाहतो तेव्हा वाटतं आसक्तीच्या दलदलीतून बाहेर पडण्याची, विशेषत्वाच्या विळख्यातून निसटण्याची, अहंकाराच्या कैदेतून सुटण्याची किमान धडपड तरी करायला हवी. स्वतः शांततेनं जगावं आणि इतरांना त्यांच्या नैसर्गिक पद्धतीनं जगू द्यावं. मानवी जीवनाच्या यात्रेचं सूत्र बंधूभाव , मैत्र, सहभाव, आस्था आणि करुणा हेच हवं. सुखदुःखाची वाटणी करायची नसेल, विलगतेकडे झुकायचं असेल, तर ज्ञानोबा माउलींच्या वैश्विक बंधुभावाच्या आणि समतेच्या संदेशाचं विस्मरण झाल्यासारखं होईल. काळाच्या या बिंदूवर असं तर व्हायला नको.



## ट्रम्पची मानहानीकारक कोंडी

इस्त्रायल आणि आखाती देशांमध्ये जे युद्ध सुरू होते त्यात अमेरिका उतरल्याने त्याची तीव्रता वाढली. अमेरिका आणि इस्त्रायलने इराणवर जोरदार हल्ले केले. इराणने इस्त्रायलवरही हल्ले केले. इतकेच नव्हे तर इराणने आखाती देशांमधील अमेरिकी लष्करी तळ उद्ध्वस्त करण्यासाठी त्यांच्यावरही रॉकेट हल्ले केले. यामुळे इराणसोबत आखाती देश आणि इस्त्रायलचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अमेरिका हा देश जरी बलशाली असला तरी ४० दिवस चाललेल्या या युद्धामुळे अमेरिकेचे सगळे अंदाज चुकले आहेत. त्यामुळे त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. इस्त्रायल आणि आखाती देशांमधील युद्धात अमेरिकेला उगाचच ढकलले जात आहे, असा आरोप अमेरिकेतील लोक राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर करत आहेत. इतकेच नव्हे तर अमेरिकेने या युद्धातून बाहेर पडावे यासाठी ट्रम्प यांच्या विरोधात केवळ अमेरिकेतच नव्हे तर युरोपमध्ये लाखोंचे मोर्चे निघाले. अमेरिकेने त्यांचे मित्र असलेल्या नाटो देशांना या युद्धात आपल्या बाजूने खेचण्याचा प्रयत्न केला, पण त्यांनी त्याला नकार दिला. त्यामुळे ट्रम्प प्रचंड नाराज झाले. त्यामुळे त्यांनी इराणला अंतिम इशारा दिला. आम्ही इराणची संस्कृती नष्ट करू, त्यांना पाषाणयुगात पाठवू, अशी अवाढव्य विधाने ट्रम्प यांनी केली. त्यामुळे जपानमधील हिरोशिमा आणि नागासाकी यांच्यावर वापरला तसा अमेरिका अणूबॉम्ब वापरणार की काय, अशा शंका जगभरातील लोकांना येऊ लागली. पण ट्रम्प यांनी तसे काही केले नाही. उलट त्यांनी शस्त्रसंधी करून १४ दिवस शांत राहायचे ठरवले.

बंडखोर इराणला वठणीवर आणण्यासाठी आणि आपल्या लाडक्या इस्त्रायलला मदत करण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धात उडी घेतली खरी, पण ती आता त्यांना महागात पडली आहे. इराणला नमवून आखातातील खनिज तेलावरही ट्रम्प यांना नियंत्रण मिळवायचे आहे. पण जसा युद्धाचा कालावधी वाढत आहे, तसा त्याचा फटका आपल्याला बसत आहे. इतकेच नव्हेतर इराणला दोन-चार दिवसात गुडघ्यावर आणण्याच्या वल्गनाही पोकळ ठरल्या आहेत, हे ट्रम्प यांच्या लक्षात आले आहे. डोनाल्ड ट्रम्प इराणविरोधात आरडाओरडा करून, वादग्रस्त विधाने करून, काही वेळा शिव्या देऊन आपले वैफल्य व्यक्त करत आहेत. पण इराण त्यांना शांतपणे आपला निर्धार बोलून दाखवत आहे. आम्ही काहीही केल्या शरणागती पत्करणार नाही, असे इराण ठामपणे सांगत आहे. यातून तोडगा काढण्यासाठी म्हणजे या युद्धातून बाहेर पडण्यासाठी आता अमेरिकेला सुरक्षित रस्ता हवा आहे. त्यासाठी त्यांनी त्यांचा पारंपरिक हरकाम्या असलेल्या पाकिस्तानचा वापर करायचे ठरवले.

खरे तर पाकिस्तानची अवस्था सध्या अतिशय वाईट झालेली आहे, दहशतवादाने हा देश पोखरलेला आहे. अमेरिकेने आंतरराष्ट्रीय दहशतवादी म्हणून घोषित केलेले अनेक दहशतवादी पाकिस्तानात होते आणि आहेत. ज्या ओसामा बीन लादेनला शोधण्यासाठी अमेरिका आकाशपाताळ एक करत होती, तो ओसामा बीन लादेन पाकिस्तानातच सापडला. पाकिस्तान हा दहशतवाद्यांचा अड्डा झालेला आहे, असे अमेरिकेचे माजी अध्यक्ष बराक ओबामा यांनी सांगितले होते. त्याच देशात इराण आणि अमेरिकेची शांतता चर्चा झाली. त्या चर्चेतून खरे तर काही निष्पन्न होण्याची शक्यताच नव्हती आणि नेमके तेच झाले. अमेरिकेने आपले प्यादे असलेल्या पाकिस्तानला पुढे करून इराणला आपल्या अटी मान्य करून घेण्याचा प्रयत्न केला, पण इराण काही अमेरिकेच्या जाळ्यात सापडला नाही. त्यामुळे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा आरडाओरडा सुरू केला आहे. आता त्यांनी फक्त इराणलाच नव्हे तर सगळ्या जगाला वेठीस धरायचे ठरवले आहे. म्हणजे होर्मुझची सामुद्रधुनी पार करताना इराणला जी तेल आणि मालवाहू जहाजे जकात देतील, त्या जहाजांना आम्ही खाडी पार करू देणार नाही. याचा अर्थ इराणवर अमेरिकेने अगोदर निर्बंध लादले आहेत. आता त्यांना मिळणारी जकात थांबवून त्यांची आर्थिक कोंडी करायचे अमेरिकेने ठरवले आहे.

अमेरिकेने इराणसमोर प्रामुख्याने त्यांच्याकडे असलेला युरेनियम साठा नष्ट करणे आणि अण्वस्त्र कार्यक्रम बंद करणे तसेच होर्मुझ खाडीवरील ताबा सोडणे या अटी ठेवल्या आहेत. या अटी इराणने फेटाळून लावल्या आहेत. होर्मुझ खाडीचे नियंत्रण आपल्या ताब्यात ठेवून इराणने जगाच्या नाड्या आपल्या हातात ठेवल्या आहेत. तर आपला कडवा शत्रू इस्त्रायलकडे अण्वस्त्रे आहेत तर मग आमच्या सुरक्षेसाठीही अण्वस्त्रांची आम्हाला गरज आहे, असे इराणचे म्हणणे आहे. त्यामुळे इराण अण्वस्त्र विकास कार्यक्रम रद्द करण्याबाबत वचन देऊ शकणार नाही. इराणच्या हातात अण्वस्त्रे आली तर इस्त्रायलवर त्याचा वचक राहीलच, पण त्याचसोबत आखातातील अन्य मुस्लीम देशांवरही इराणचा दबदबा राहील, त्यामुळे आखाताचा दादा होण्याचा इराणचा मार्ग मोकळा होईल. सध्या इराणमध्ये जे सत्ताधीश आहेत, ते काही अमेरिकेला जुमानणारे नाहीत.

इराणवर धार्मिक नेत्यांचा प्रभाव आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत इराणसारख्या देशाकडे अण्वस्त्र आले तर ते इस्त्रायलला खूपच भारी पडेल. इस्त्रायल आणि आखाती देश यांच्यातील संबंध हे रक्तरंजित हिंसाचाराचे राहिलेले आहेत. अशा स्थितीत इराणकडे अण्वस्त्र आले, तर परिस्थिती अवघड होईल. ते असू नये, म्हणून अमेरिकेची धडपड सुरू झालेली आहे. पण आता आखाती युद्धात अमेरिका अडकली आहे, त्यात पुन्हा इराणला रशिया आणि चीनकडून मदत मिळत असणार, यात शंकाच नाही. त्याशिवाय इराण इतकी तग धरणार नाही. आता अमेरिकेला ते कळून चुकले आहे. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प हे इराणला शरण आणण्यासाठी कितीही प्रयत्न करत असले तरी त्याचा काही उपयोग होईल, असे वाटत नाही. त्यामुळे आखातातील युद्ध हे रशिया आणि युक्रेनप्रमाणे कमी तीव्र होऊन चालत राहील. यात ट्रम्प यांची मात्र चोहो बाजूंनी मानहानीकारक कोंडी झालेली आहे.

## राजीनाम्याचे प्रश्नोपनिषद



**न्या. वर्मा यांच्या घरी आढळलेल्या नोटा कोठून आल्या किंवा त्यामागे एखादे भ्रष्टाचारासारखे प्रकरण आहे का, असे विषय जनतेसाठी गुलदस्तातच राहणार का आणि न्यायमूर्ती हे कायद्यापेक्षा वर आहेत का, असे प्रश्न जनतेला पडल्यास नवल नाही.**

घरी नोटांची पुडकी आढळल्याने वादात सापडलेले न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या विरोधात सुरू असलेल्या महाभियोगाचा प्रश्न निकाली निघाला असला, तरी या प्रकरणाने न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचार, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांबाबत अनेक प्रश्नचिन्हे उपस्थित केली आहेत.

लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी नेमलेल्या चौकशी समितीपुढे बाजू मांडण्याच्या दिवशीच न्या. वर्मा यांनी राजीनामा देणे पसंत केले. दिल्ली उच्च न्यायालयात न्यायमूर्ती असताना त्यांच्या सरकारी निवासस्थानी लागलेल्या आगीत अग्निशामक विभागाच्या जवानांना नोटांची पुडकी आढळली. या प्रकरणामुळे साऱ्या देशात खळबळ उडाली. त्यानंतर त्यांची अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली झाली. मात्र, त्यांच्याकडे न्यायिक कामकाज सोपवण्यात आले नव्हते; तसेच तेथील वकील संघटनांनीही त्यांच्या नियुक्तीला विरोध केला. सर्वोच्च न्यायालयाच्या चौकशीतही जळीत नोटांबाबत प्रश्नचिन्हे उपस्थित झाली ; मात्र न्या. वर्मा यांनी या नोटांशी आपला संबंध नसल्याचा पवित्रा घेतला. न्यायमूर्तींना पदावरून हटवण्यासाठी संसदेमध्ये महाभियोग चालवावा लागतो; त्यानुसार न्या. वर्मा यांच्या विरोधात लोकसभा आणि राज्यसभेतही महाभियोगाचे प्रस्ताव सादर झाले.

राज्यसभेत विरोधकांचा प्रस्ताव स्वीकारल्याने अतिवरिष्ठ नेतृत्व नाराज झाल्याने जगदीप धनखड यांना उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा द्यावा लागला आणि लोकसभेत ही प्रक्रिया सुरू झाली. याविरोधात न्या. वर्मा यांनी केलेली याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्यानंतर महाभियोगाला सामोरे जाण्याशिवाय त्यांच्यापुढे पर्याय राहिला नाही. त्या पार्श्वभूमीवर त्यांनी राजीनामा दिला. यापूर्वीही महाभियोग दाखल झालेल्या तीन न्यायमूर्तींनी राजीनामे देऊन संभाव्य कारवाई टाळल्याची उदाहरणे आहेत.

अर्थात, सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या समितीकडील चौकशी अजूनही प्रलंबित आहे. भ्रष्टाचाराच्या टीकेवरून न्यायपालिका अतिसंवेदनशील राहिली आहे. नुकतेच या विषयावरील एका धड्यावरून सर्वोच्च न्यायालयाने संबंधितांना फैलावर घेऊन क्रमिक पुस्तक मागे घेण्याचा आदेश दिला होता; न्यायमूर्तींवरील अशा आरोपांबाबतही तशीच धडाडी आणि पारदर्शकता दिसून आली, तरच जनतेचा न्यायसंस्थेवरील विश्वास टिकून राहील, याचीही जाणीव ठेवली पाहिजे.

# पेरूचे आरोग्यदायी सरबत

**साहित्य :** एक पिकलेला पेरू, दोन चमचे साखर (चवीनुसार), अर्धा इंच अद्रकाचा (आलं) तुकडा, चवीनुसार मीठ, अर्धा चमचा लिंबाचा रस, एक ते दीड कप पाणी थंड पाणी

**कृती :** पिकलेला पेरू धुवून त्याची साल काढावी. पेरूच्या फोडी करून घ्याव्यात. यानंतर या फोडी मिक्सरच्या भांड्यात टाकाव्यात. सोबत अद्रक, मीठ, लिंबाचा रस व एक कप थंड पाणी टाकून मिक्सर फिरवावे. हे सर्व मिश्रण गाळून घ्यावे... तुमच्यासाठी ताजे थंडगार सरबत तयार..



# सुंदर लिप्ससाठी टिप्स !

**आज प्रत्येक महिला लिपस्टिकचा वापर करत आहे. त्या आपल्या संपूर्ण जीवनकालात किमान ५ किलो लिपस्टिक पोटात टाकतात पण त्याचा आरोग्यावर काही विपरित प्रभाव पडत नाही असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. लिप्सला जर हॉट बनवायचे असेल तर खाली दिलेल्या टिप्सचा वापर करावा.**

**तुम्हाला** तुमचे आकर्षण कायम ठेवायचे असेल तर सर्वप्रथम तुम्हाला तुमच्या ओठांकडे लक्ष्य देण्याची गरज आहे. आज प्रत्येक महिला लिपस्टिकचा वापर करत आहे. त्या आपल्या संपूर्ण जीवनकालात किमान ५ किलो लिपस्टिक पोटात टाकतात पण त्याचा आरोग्यावर काही विपरित प्रभाव पडत नाही असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. लिप्सला जर हॉट बनवायचे असेल तर खाली दिलेल्या टिप्सचा वापर करावा.

▮रोज ५ ते ६ ग्लास पाणी प्यायला पाहिजे. पाण्यामुळे फक्त शरीराला लागणारी पाण्याचीच पूर्ती पूर्ण होत नाही तर ओठांची नमी कायम राहते.

▮बऱ्याच लोकांना ओठांना चावायची सवय असते ती बदलायला पाहिजे. दीर्घ काळापर्यंत लिपस्टिकची चमक कायम ठेवण्यासाठी लिपस्टिक लावल्यानंतर टिशू पेपरने एक्स्ट्रा लिपस्टिक काढून घ्यावी. यामुळे लिपस्टिकची चमक पूर्ण दिवसभर कायम राहते.

▮डार्क कलरचे लिपस्टिक लिप्सला स्मॉल लूक देतात. जर तुमच्या ओठांचा आकार लहान असेल आणि त्याला मोठा लूक द्यायचा असेल तर नॅचरल कलरचे लिपस्टिक वापरायला पाहिजे.

▮जर ओठ जाड असतील तर कन्शिलर आणि फाऊंडेशनच्या मदतीने लिप्सला पातळ शेप देऊ शकता. लिप लायनरने आऊट लाइन ड्रॉ करावी आणि डार्क कलरचे लिपस्टिक त्यात भरायला पाहिजे.

▮जर लिप्सला हॉट लूक द्यायचा असेल तर स्ट्राबेरी आणि चेरी शेड्सचा लिपस्टिकसुद्धा लावू शकता.

▮ बदलत्या मोसमाचा सर्वात जास्त प्रभाव ओठांवर पडतो. म्हणून नेहमी चांगल्या कंपनीचे लिप बाम दिवसातून दोन-तीन वेळा लावायला पाहिजे.



# उन्हाळ्यात सोडा, पॅक्ड ज्यूस वगळून केवळ प्या पाणी

**वजन कमी होतं**

हल्लीच्या लाइफस्टाइलमध्ये सगळे वाढत असलेल्या वजनामुळे परेशान असतात. अशात वजन कमी करण्यासाठी शुगर असलेले पेय पदार्थ न पिता केवळ पाणी पिणे योग्य ठरेल. याने अधिक प्रमाणात कॅलरी बर्न होण्यात मदत मिळेल.

**चयापचय क्षमता वाढेल**

केवळ पाणी पिण्याने आपली चयापचय क्षमता वाढेल आणि यामुळे ऊर्जेचे स्तरदेखील. म्हणून दिवसभर खूप पाणी प्या. या व्यतिरिक्त अधिकाधिक पाणी पिण्याने आपल्याला ध्यान केंद्रित करण्यात देखील मदत मिळेल.

**खाण्यावर नियंत्रण**

आपली डाइट घेल्यानंतरही आपल्याला भूक जाणवत असेल तर केवळ एक ग्लास पाणी प्यावे. याने वजन नियंत्रित करण्यात मदत मिळेल. अनावश्यक कॅलरीज कमी करण्यासाठी पाणी पीत राहावे.

**विषारी पदार्थ शरीरातून बाहेर काढते**

अधिक पाणी पिण्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात. ज्यामुळे त्वचेचे आरोग्य उत्तम राहते आणि वय वाढले तरी तारुण्य टिकून राहते. या व्यतिरिक्त अनेक आजार हाय ब्लड प्रेशर, हृदयासंबंधी आजार आणि अपचन सारखे आजार होण्याचा धोका टळतो.



# खानपानच्या ५ असंगत जोड्या सेवन करताना काळजी घ्या

**खाण्या-पिण्याच्या भिन्न वस्तू आरोग्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे फायदा करतात. काही पदार्थ मिसळून खाल्ल्याने फायदा होतो तर काही पदार्थ असे आहेत जे सोबत खाल्ल्याने आरोग्यावर विपरित परिणाम होऊ शकतो. तर जाणून घ्या अशा ५ जोड्यांबद्दल, ज्याचे सेवन टाळावे.**

**आंबा आणि काकडी**

उन्हाळ्यात आंबा आणि काकडी दोन्हीचे खूप सेवन केलं जातं, परंतु जेवताना दोन्ही सोबत खाणे आरोग्यासाठी नुकसानदायक ठरतं. आंबा एक फळ आहे तर काकडी भाजी म्हणून दोघांना पचनासाठी वेगवेगळ्या एनजाइम्सची गरज भासते, अशात दोन्ही सोबत खाल्ल्याने पचन संबंधी समस्या होऊ शकतात.

**डेअरी प्रॉडक्ट्स आणि पालक**

पालकासह डेअरी प्रॉडक्ट्समध्ये पनीर मिसळून तयार भाजी लोकं चव घेऊन खातात. परंतु डेअरी प्रॉडक्ट्समध्ये कॅल्शियम भरपूर प्रमाणात आढळतं आणि पालकात आढळणारे ऑक्सॅलिक ॲसिड शरीराला कॅल्शियम अवशोषित करण्यापासून थांबवतो. ज्यामुळे हे पदार्थ सोबत खाल्ल्याने फायदा होत नाही.

**दूध आणि डाळी**

अनेक पोषण विशेषज्ञाचे म्हणणे आहे की, दुधाचे पचन पोटाऐवजी छोट्या इन्टेस्टाइनमध्ये होतं आणि डाळीने तयार कोणते हा पदार्थ शरीर वेगळ्याने पचवतो. अशात दोन्ही सोबत खाल्ल्याने पचन क्रियेची गती कमी होते.

**भोजनासह फिजी ड्रिंक्स**

फिजी व कार्बोनेटेड ड्रिंक्समध्ये अती प्रमाणात साखर असते. हे भोजनासह घेतल्याने पचन प्रणाली वाईट रित्या प्रभावित होते. याने पचन क्रियेची गती कमी होते आणि सोबतच गॅस व ब्लॉटिंगसारख्या समस्या उद्भवू लागतात.

**दूध आणि ॲंटीबायोटिक्स**

ॲंटीबायोटिक औषध दुधासोबत घेतल्याने औषधांचा प्रभाव पडत नाही असे मानले जाते.

# बेबी मसाजचे फायदे माहीत आहेत का?

**मुलांच्या** सर्वांगीण विकासासाठी त्यांचा आहार, देखरेख व पोषक वातावरण आदी महत्त्वपूर्ण गोष्टींची काळजी घ्यावी लागते. मात्र याव्यतिरिक्त बाळ तंदुरुस्त राहावे म्हणून बेबी मसाज लाभदायी असतो. मसाजमुळे मुलांची हाडे तंदुरुस्त होतात. शिवाय मुलाच्या बुद्धीलाही चालना मिळत असते. लहान मुलाच्या मसाजचा भारतीय आयुर्वेदातही उल्लेख आढळतो.



**मसाजचे फायदे-**

▮मसाजमुळे मुलाचे वजन वाढण्यास मदत होते.

▮दिवसभरातून किमान एक वेळा मसाज केल्याने मुलाचे स्नायू बळकट होतात.

▮मसाजमुळे मुलामधील एकाग्रता वाढते.

▮ मुलाच्या पोट व पचनक्रियेसंबंधी व्याधी दूर होतात.

▮मसाजमुळे मुले व आई यांच्यात घनिष्टता वाढीस लागते.

▮मसाजमुळे मुलांना शांत झोप लागत असते.

▮मसाजमुळे मुलाचा शारीरिक व मानसिक विकास होत असतो.

# रोज एक फळ खाण्याची सवय लावा

**बऱ्याच काळापासून असे म्हटले जाते की ताजी फळे खाण्याचे फायदे खूप आहेत. यामुळेच सर्वांनी ही वस्तुस्थिती स्वीकारून आपल्या आहारात फळांचा समावेश केला आहे. फळाची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यात अनेक प्रकारची जीवनसत्त्वे, खनिजे आणि आहारातील फायबरसारखे पोषक घटक आढळतात. यामुळे आपले शरीर मजबूत होते. फळे शरीराला चांगल्या प्रकारे कार्य करण्यास मदत करण्यासाठी विविध प्रकारचे पोषक प्रदान करतात. फळांमुळेच शरीराची प्रतिकारशक्ती वाढते आणि आपल्या पेशींना दुरुस्तीची संधी मिळते. जरी असे खूप कमी लोक असतील ज्यांनी दररोज एक फळ खाण्याचा विचार केला असेल. चला जाणून घेऊया रोज एक फळ खाणे आरोग्यासाठी का महत्त्वाचे आहे?**

▸ **रक्तातील साखरेचे नियंत्रण :** सर्व फळांमध्ये नैसर्गिकरित्या साखर असते. त्यात फायबर आणि पोषक घटक देखील असतात. त्यांच्यामुळे रक्तप्रवाहात साखर शोषून घेण्याची क्षमता कमी होते. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी झपाट्याने वाढत नाही.

▸ **मानसिक आरोग्य :** फळांमध्ये नैसर्गिकरीत्या काही पोषक घटक असतात, ज्यामुळे आपले मानसिक आरोग्य चांगले राहते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे जामुन, जे मानसिक आरोग्य सुधारणारे फळ म्हणून ओळखले जाते.

▸ **वजन नियंत्रणात ठेवा :** फळांची एक चांगली गोष्ट म्हणजे त्यामध्ये कॅलरीज कमी असतात. त्यात फॅटचे प्रमाणही कमी आढळते, तर फायबर आणि पाण्याचे प्रमाण अधिक असते. यामुळेच आहारात फळांचा समावेश केल्यास वजन नियंत्रित ठेवण्यास मदत होते.

▸ **ॲंटिऑक्सिडंट्स :** फळांमध्ये ॲंटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात आढळतात. यामुळे, तुमच्या पेशींना ऑक्सिडेटिव्ह तणावामुळे होणारे नुकसान टाळण्याची संधी मिळते. ॲंटिऑक्सिडंट्स हृदयविकाराचा झटका, कर्करोग आणि न्यूरोडीजनरेटिव्ह विकारांचा धोका देखील कमी करतात.

▸ **पचन सुधारते :** फळे नैसर्गिक एन्झाईम्सने भरलेली असतात. यामुळे तुमची पचनक्रिया चांगली होते. उदाहरणार्थ, अननसातील ब्रोमेलेन आणि पपईतील पपेन हे पचनासाठी चांगले असतात. हे एन्झाइम प्रथिने तोडण्यास मदत करतात.



# ॲसिडिटीवर करा घरगुती उपचार

**अनेक** जणांना ॲसिडिटीचा मोठा त्रास होतो. डोकं दुखणं, मानदुखी, छातीत जळजळ होणे, उलट्या होणे, अर्धशिशी, अस्वस्थ होणे अशा प्रकारचा त्रास होतो. झोप पूर्ण न होणं, जागरण, उपाशी राहाणं, चुकीची जीवनशैली, अवेळी खाणे, झोपेच्या सतत बदलत्या वेळा यामुळे त्रास होत असतो. ॲसिडिटीचा त्रास कमी करण्यासाठी अनेक जण गोळ्या घेतात. परंतु अशा गोळ्यांमुळे काही वेळ बरं वाटतं, परंतु पुन्हा त्याचा त्रास सुरू होतो. सतत गोळ्या घेतल्याने त्याचा शरीरावरही घातक परिणाम होत असतो. परंतु ॲसिडिटीवर घरगुती उपयांनीही काही वेळात आराम मिळू शकतो.

▮सतत ॲसिडिटीचा त्रास होत असणाऱ्यांनी थंड दूध प्यायल्याने पोटात आणि छातीत होणारी जळजळ कमी होते.

▮आल्याचा तुकडा चावून खाल्ल्यानंतर त्यावर गरम पाणी प्यायल्याने फायदा होतो.

▮केळे ॲसिडिटीवर अतिशय नैसर्गिक उपाय आहे. ॲसिडिटीचा त्रास होत असल्यास नियमित केळे खाल्ल्याने फायदा होतो.

▮बडिशेप ॲसिडिटी कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. जेवणानंतर बडिशेप खाल्ल्याने ॲसिडिटीचा त्रास होत नाही. बडिशेप चावून किंवा चहा करूनही पिऊ शकतात.

▮आवळा सी विटॅमिनयुक्त असतो. आवळा पोटदुखी, गॅस, ॲसिडिटीमध्ये आराम देतो. आवळा पित्त कमी करत असून केसांचं आणि त्वचेचंही आरोग्य राखतो.


▮ टोमॅटोमध्ये कॅल्शियम, फॉस्फरस आणि विटॅमिन सी असतं. जे शरीरातील जीवाणूंना बाहेर काढतं. टोमॅटो आंबट असलं तरी शरीरात क्षारांचे प्रमाण वाढवतं. टोमॅटोच्या नियमित सेवनाने ॲसिडिटीची समस्या कमी होते.

▮मसाल्यांमधील ओवा अतिशय गुणकारी आहे. ॲसिडिटीवरही ओवा फायदेशीर आहे. ॲसिडिटीचा झाल्यास ओवा आणि जिरं एकत्र भाजून घ्या. हे मिश्रण पाण्यात टाकून थोडी साखर टाकून प्यायल्याने फायदा होतो.

▮गुळात मॅग्नेशियम असतं. मॅग्नेशियम आतड्यांना मजबूत करण्याचं काम करतं. त्यामुळे पचनक्रिया सुरळीत होते. रोज जेवणानंतर गुळ खाल्ल्याने पित्त, ॲसिडिटीचा त्रास कमी होतो.

▮वेलची खाल्ल्याने ॲसिडिटीची समस्या दूर होते. एक ग्लास पाण्यात २ वेलची उकळून पाणी थंड करून प्या. त्यामुळे ॲसिडिटीचा त्रास दूर होतो.

▮तुळशीची पानंही पित्ताच्या, ॲसिडिटीच्या त्रासावर गुणकारी आहेत. पित्ताचा, ॲसिडिटीचा त्रास होत असल्यास तुळशीची काही पानं चावून खा किंवा पानं पाण्यात उकळवून ते पाणी पिण्यानेही फायदा होतो. नियमित तुळशीची पानं खाल्याने पित्ताचा त्रास कायमचा बरा होतो.



# उन्हाळ्यात जीन्स वापरताय, अशी घ्या काळजी...

**उन्हाळ्यात सगळ्यात सोयीस्कर म्हणून तुम्ही जीन्स घालत असाल, तर तुमच्यासाठी एक महत्त्वाची बातमी आहे. उन्हाळ्यात बाहेर निघालं की शरीराची अक्षरशः लाही-लाही होण्यास सुरुवात झाली आहे. अशात जर तुम्ही घट्ट जीन्स वापरत असाल, तर जीन्स वापरताना नक्की काळजी घ्या. उन्हाळ्यात घराबाहेर पडताना जीन्स-टॉप किंवा टी शर्ट आणि गॉगल लावला असा रफटफ पेहराव तुम्ही करत असाल. तर तुमच्यासाठी थोडं महत्त्वाचं...**

**जीन्स** अतिशय घट्ट असेल तर जंतुसंसर्ग होण्याचा धोका असतो. घट्ट जीन्स वापरल्यामुळे त्वचेची जळजळ, त्वचा काळवंडणं, घामोळ्या येणं, खाज सुटणं, काळे चट्टे येणं असे त्रास होऊ शकतात. गेल्या काही दिवसांत घट्ट जीन्समुळे जंतुसंसर्ग झाल्याचं प्रमाण वाढलंय. विशेष म्हणजे खाज कमी करण्यासाठी स्टेरॉईडयुक्त मलम लावलं जातं. त्यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता असते. उन्हाळा असल्यास पातळ, सुती कपडे घालणे योग्य आहे. त्यामुळे शरीरीतील घाम शोषूण घेण्यास मदत होते. जाड कपड्यांचा पेहराव शक्यतो करू नये. त्याचप्रमाणे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतीही क्रीम वापरू नये, असा सल्ला डॉ. उदय कोपकर, त्वचारोगतज्ज्ञ यांनी दिला आहे.

उन्हाळ्यात प्रामुख्याने अतिनील किरणांमुळे डोळ्यांना त्रास होतो. गॉगल बी २ इतका काळा असणं गरजेचं आहे. यूव्ही-रेजपासून संरक्षण करणाऱ्या कॉण्टॅक्ट लेन्ससुद्धा उपलब्ध आहेत. यंदाच्या उन्हाळ्यात तुमच्या शरीराची काळजी नक्की घ्या.





**शारीरिक विकास आणि तंदुरुस्त राहणे यासाठी जीवनसत्त्वे, खनिजे यांची आवश्यकता असते. या घटकांची कमतरता असल्यास शरीराला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ई जीवनसत्त्वही शरीरासाठी महत्त्वाचे असते. रोगांपासून बचाव करण्यासाठी ई जीवनसत्त्व गरजेचे असते. त्याची कमतरता भासल्यास केस, डोळे, त्वचा यांच्याशी निगडित अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ई जीवनसत्त्वाची कमतरता भासल्यास शरीराकडून काही संकेत मिळतात. शरीराच्या या संकेतांकडे वेळीच लक्ष न दिल्यास अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेची कारणे, त्याची लक्षणे आणि कमतरता भरून काढण्यासाठी काय उपाय करावेत ते पाहूया.**

# ‘ई’ जीवनसत्त्वाची कमतरता

**कमी** चरबीयुक्त आहार घेतल्यास शरीराला ‘ई’ जीवनसत्त्वाची कमतरता भासते. ज्या लोकांना आतड्यांशी निगडित आजार आहेत. उदा, क्रोहन आणि पित्त (गॉलब्लाडर) या समस्या भेडसावत असतील त्यांच्यामध्ये ई जीवनसत्त्वाची कमतरता असते.

**लक्षणे :**

**स्नायू कमजोर होतात :** ई जीवनसत्त्वाची कमतरता असल्यास स्नायू कमजोर होतात. ई जीवनसत्त्व आणि सेलेनियमची कमतरता असल्यास मायोपॅथीची समस्या वाढते. मायोपॅथीमध्ये स्नायू सुकायला लागतात ते पसरू लागतात किंवा स्नायूंमध्ये वाकडेपणा येतो. ज्यामुळे शरीराचे अवयव वाकडे होऊ लागतात. चालण्या-फिरण्यात अडचणी निर्माण होतात. लहान मुले आणि ज्येष्ठ व्यक्ती यांना हा आजार होण्याचा धोका अधिक आहे. त्याव्यतिरिक्तही अनेक समस्या निर्माण होतात.



**दृष्टी कमी होणे :** ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे डोळ्यांचा रेटिना आणि डिजनरेशन पातळ होते. त्यामुळे डोळ्यातील आतल्या भागावर त्याचा परिणाम होतो. अनेकदा दृष्टी धुसर होते आणि रात्री काही न दिसण्याची समस्या म्हणजे रातआंधळेपणा येऊ शकतो.



**रक्ताची कमतरता :** अनेकदा शरीरात रक्ताची कमतरता होऊ लागते. हल्ली रक्तपेशी कमी होणे यात नवल राहिलेले नाही. ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळेही असे होऊ शकते. त्यामुळे शरीराला योग्य प्रमाणात ऑक्सिजन मिळत नाही आणि व्यक्ती अशक्त होऊ लागते.

**ई जीवनसत्त्वाची कमतरता कशी पूर्ण कराल?**

शाकाहारी लोकांना ई जीवनसत्त्वाची कमतरता पूर्ण करण्यासाठी भाज्या, हिरव्या पालेभाज्या, सुकामेवा, रताळे, सलगम, मोहरी, आंबा, ब्रोकोली, गहू, बीन्स, अव्हाकॅडो इत्यादींचा समावेश आपल्या आहारात करावा.

# केळी खाण्याचे असेही फायदे

**फळांमधील केळे आरोग्यासाठी अतिशय गुणकारी ठरते. केळ्यात पोटॅशियम आणि विटॅमिन भरपूर प्रमाणात असतात. त्याशिवाय केळ्यात इतरही अनेक पोषक तत्त्व असतात, जी शरीरासाठी अतिशय गुणकारी असतात. त्यामुळेच कोणत्याही प्रकारचं केळे आपल्या खाण्यात सामील केल्याने फायदे होतात. दररोज केळे खाल्ल्याने हार्ट ॲटॅकची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होते. त्याशिवाय केळ्याचे इतरही अनेक फायदे आहेत. आज वर्ल्ड बनाना डे आहे. या विशेष दिवशी जाणून घ्या अति पिकलेल्या केळ्याचे जबरदस्त फायदे.**



**केळ्याचा** रंग जसजसा काळा पडत जातो, ते अधिक, अति पिकलं जातं असं केळं अनेक जण खराब झालं म्हणून किंवा काळं आणि अतिशय मऊ झालं म्हणून खायला आवडतं नसल्याचं सांगतात. परंतु अति पिकलेलं, मऊ, काळं झालेलं केळं शरीरासाठी अतिशय गुणकारी असतं. या केळ्याच्या दररोज खाण्याने अनेक आजारांपासून दूर राहण्यास मदत होते.

रंगाच्या आधारे केळं पिकलेलं आहे किंवा कच्चं आहे याचा अंदाज लावता येतो. केळ्याचा रंग जर हिरवा असेल तर ते कच्चं केळं म्हणून ओळखलं जातं. अशा केळ्याचा वापर भाजीसाठी केला जातो. त्यानंतर केळ्याचा रंग पिवळा होत जातो. केळं अधिक पिकत गेलं की त्यावर काळे डाग पडायला सुरुवात होते. त्यानंतरही काही दिवसांत केळ्याचं संपूर्ण सालचं काळं पडत. युनायटेड नेशनमधील ‘इंटरनॅशनल फंड फॉर ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट’ या संस्थेने अति पिकून संपूर्ण साल काळं पडलेल्या केळ्याचे महत्त्व, त्याचे फायदे सांगितले आहेत. अशा केळ्यात ट्रिप्टोफॅन मोठ्या प्रमाणात असतं. त्यामुळे मानसिक ताण, चिंता (Anxiety) कमी होण्यास मदत होते. तसेच या मोठ्या प्रमाणात पोषकद्रव्ये असतात. त्यामुळे अशा केळ्याचा वापर ब्रेड बनवण्यासाठी तसेच मिल्कशेक बनवण्यासाठी केला जाऊ शकतो.

हिरवी साल असलेलं केळं खात असाल तर त्यामुळे रक्तातील साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेवण्यास मदत होते. हे केळं अगदी हळूहळू पचतं. त्यामुळे ब्लड ग्लुकोज कमी प्रमाणात निर्माण होतं. पिकलेलं केळं ॲण्टी-ऑक्सिडेंट म्हणून मानलं जातं. हे केळं मेटबॉलिज्म अर्थात चयापचन क्रियेला मजबूत करण्यात मदत करते. त्यामुळे अनेक आजार होण्याची शक्यता अतिशय कमी होते. हे केळं अगदी सहजतेने पचतं. त्यामुळे अति पिकलेल्या केळ्याचा वापर नाश्त्यामध्ये करणे अतिशय आरोग्यदायी मानले जाते. डॉक्टरांकडूनही सकाळच्या नाश्त्यात केळं खाणं गुणकारी मानले जाते.

केळे बाराही महिने बाजारात मिळणारे फळ आहे. केळ्याचा वापर सौंदर्यासाठीही केला जातो. केळं शक्तिवर्धक आहे. दररोज केळी खाणाऱ्या व्यक्तीला एनिमियाचा धोका नसतो. केळं खाल्याने मूडही चांगला राहतो. थकवा दूर होतो. केळ्यातील प्रोबायोटिक बॅक्टेरिया खाण्यातील कॅल्शियम शोषून घेते. यामुळे हाडेही मजबूत होतात.

## दंडाची पावती २२ हजार फेरीवाल्यांसाठी निर्णायक ठरणार...
# ‘टाऊन वेंडिंग कमिटी’त नगरसेवक नाहीच

**पात्र फेरीवाल्यांची जागा निश्चिती कमिटी करणार**
तसेच पात्र फेरीवाल्यांची जागा निश्चिती कमिटी करणार आहे. यात २०१४ चे पुरावे सादर करणाऱ्या फेरीवाल्यांना जागा मिळणार आहे. जागा निश्चित झाल्यानंतर त्याच्या बाजूला दुसरा फेरीवाला बसल्यास कारवाई करण्यात येईल, असा इशारा पालिका प्रशासनाने दिला आहे.




■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मुंबईतील ३२ हजार फेरीवाल्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. यात १० हजार फेरीवाल्यांकडे पालिकेच्या अनुज्ञापन विभागाचे लायसन्स आहे, तर २२ हजार फेरीवाल्यांककडे पालिकेचे रितसर लायसन्स नसले तरी ते १५ ते २० वर्षांपासून ज्या ठिकाणी फेरीवाला म्हणून विक्री करतायत तेथे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. दंडात्मक कारवाई झालेल्या फेरीवाल्यांकडे दंड आकारल्याची पावती असेल त्यांना फेरीवाला क्षेत्रात जागा उपलब्ध करून मिळणार आहे, असे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

दरम्यान, ‘टाऊन वेंडिंग कमिटी’वर नियुक्त करण्यात येणारा सदस्य हा कुठल्याही समितीवर नसावा, त्यामुळे विशेष निमंत्रित म्हणून त्यांची निवड राज्य सरकारच्या मंजुरीनंतर करण्यात येणार असल्याची माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पथविक्रेता समितीच्या निवडणुकीचा निकाल नुकताच जाहीर झाला. यात ८ झोनमध्ये सदस्य निवड झाली असून स्वीकृत सदस्यांची निवड करण्यात येणार आहे. ‘टाऊन वेडिंग कमिटी’ स्वीकृत सदस्यांची निवड करणार आहे.

# आजपासून शिव्या बंद!
## उल्हासनगरमध्ये अनोख्या मोहिमेला सुरुवात



फुले यांच्या विचारांमध्ये स्त्रीसमानता आणि सन्मानाला अत्यंत महत्त्व आहे. मात्र, आजच्या दैनंदिन बोलण्यातून स्त्रियांचा अवमान होत असल्याचे चित्र दिसते. ही दुटप्पी भूमिका बदलण्यासाठी ₹आजपासून शिव्या बंद₹ हा संकल्प प्रत्येकाने स्वीकारावा, असे आवाहन करण्यात आले.

■ **उल्हासनगर। प्रतिनिधी,**

महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त केवळ अभिवादनापुरते मर्यादित न राहता त्यांच्या विचारांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचा ठाम संदेश उल्हासनगरातून देण्यात आला आहे.

स्त्रीसन्मानाच्या घोषणांमध्ये आणि दैनंदिन व्यवहारातील भाषेत असलेल्या विसंगतीला थांबवण्यासाठी शिव्या बंद असा निर्धार करण्याचे आवाहन 'कायद्याने वागा' संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राज असरोंडकर यांनी केले आहे.

समाजातील भाषिक संस्कृती आणि स्त्रीसन्मान याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी 'कायद्याने वागा' या सामाजिक संघटनेतर्फे ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. स्त्रीवाचक शिव्या देणे ही गंभीर वैचारिक विसंगती आहे, असे स्पष्ट करत राज असरोंडकर यांनी नागरिकांना आत्मपरीक्षणाचा संदेश दिला.

## अनधिकृत इमारत पाडल्याच्या रागातून हत्येची सुपारी
# रबाळेत झालेल्या गोळीबारप्रकरणी 5 अटकेत

**इमारत पाडण्यास कारण असल्याने ‘बदला’**
आरोपी राहुल सहानी याच्याकडे चौकशी केली असता करता त्याने हा गुन्हा विशाल महाडिक व गुरफान खान यांच्या सांगण्यावरून केला. आरोपी विशाल महाडिक व गुरफान खान यांचा फियार्दीबरोबर असलेल्या जुन्या भांडणाचा राग मनात धरून तसेच जखमी अमित मौर्या याने १ वर्षापूर्वी माहिती अधिकारांतर्गत अर्ज करून नवी मुंबई मनपा विशाल आणि गुरफान यांचे लागेसंबंध असणाऱ्या एका इमारतीच्या माहिती साठी मनपाला अर्ज केला होता. त्यात ही इमारत अनधिकृत असल्याचे स्पष्ट झाल्यावर या इमारतीवर अतिक्रमण विभागाचा हातोडा पडला होता. याच कारणाने मौर्य याला ठार मारण्याची सुपारी इतर आरोपींना देण्यात आली होती. यात १० हजार रुपये रोख आणि एक सदनिका (वन बीएचके) देण्यात येणार होती.

■ **नवी मुंबई। प्रतिनिधी,**

माहिती अधिकारात इमारत अनधिकृत असल्याचे समोर आल्यावर इमारत पाडण्यात आली. याचा राग मनात बाळगून एक वर्षांनी माहिती अधिकार कार्यकर्त्यावर गोळ्या झाडून ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाच जणांना गुन्हे शाखेने अटक केली आहे. त्यांनी गुन्ह्यात वापरलेली दुचाकी चोरीची असल्याचे निष्पन्न झाले आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ता अमित मौर्य आणि यांच्यावर सहा एप्रिल रोजी ऐरोली गावातील साईनाथ वाडी येथे गोळीबार करण्यात आला होता. विशाल महाडिक, गुरफान खान, राहुल सहानी, मोहम्मद खान आणि नागेश माने असे यातील आरोपींची नावे आहेत. यातील विशाल आणि गुरफान हे सूत्रधार आहेत.

६ एप्रिलला ऐरोली गावात संदीप गवस व अमित मौर्या यांच्यावर दोन व्यक्तींनी त्यांच्यावर चार गोळ्या



झाडल्या होत्या. त्यात एक गोळी गाडीची काच फोडून त्यांच्या मानेला लागली होती. गोळ्या झाडून आरोपी फरार झाले होते, तर मौर्य यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. गुन्ह्याचा तपास रबाळे पोलीस आणि मध्यवर्ती गुन्हे शाखा समांतररीत्या करीत होते.

या गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, संजय येनपुरे यांच्या मार्गदर्शनाखालील गुन्हे प्रकटीकरण पथके व गुन्हे शाखा करत होती. आरोपींचा शोध घेण्यासाठी सहा पथके तयार करण्यात आली होती.

# राज्यातील उघड्या विहिरींचा ‘सुरक्षित जलस्त्रोत’ म्हणून जतन करा... पर्यावरण अभ्यासकांचे राज्य सरकारला निवेदन

■ **ठाणे। प्रतिनिधी,**

राज्यातील उघड्या विहिरींमुळे घडणाऱ्या भीषण दुर्घटनांच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण अभ्यासक डॉ. प्रशांत रवींद्र सिनकर यांनी राज्य सरकारचे लक्ष वेधले आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना महत्त्वपूर्ण निवेदन सादर केले असून, विहिरी बुजवण्याऐवजी त्यांचे ‘सुरक्षित जलस्रोत’ म्हणून जतन व संवर्धन करण्याची भूमिका मांडली आहे.

दिंडोरी आणि कंकराळा येथे विहिरीत पडून झालेल्या अलीकडील दुर्घटनांमुळे राज्यभरात चिंता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर केवळ विहिरी बुजवण्याचा उपाय पर्यावरणदृष्ट्या घातक ठरू शकतो, असे डॉ. सिनकर यांनी नमूद केले. विहिरी भूजल पुनर्भरणासाठी अत्यंत महत्त्वाच्या असून स्थानिक पर्यावरणाचा अविभाज्य भाग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विहिरी बुजवल्यास



भविष्यात पाणीटंचाईची समस्या अधिक गंभीर होऊ शकते, असा इशाराही त्यांनी दिला आहे. निवेदनात राज्य शासनाने तातडीने काही ठोस उपाययोजना राबवण्याची मागणी करण्यात आली आहे.

यामध्ये राज्यातील सर्व विहिरींचे ‘सुरक्षा ऑडिट’ करून रिस्क मॅपिंग करणे, प्रत्येक विहिरीभोवती किमान चार फूट उंच संरक्षक भिंत व लोखंडी जाळी बसवणे, तसेच वनक्षेत्रालगतच्या विहिरींमध्ये वन्यजीवांसाठी ‘एस्केप रॅम्प’ तयार करणे यांचा समावेश आहे. याशिवाय, या कामांसाठी मनरेगा किंवा जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून आर्थिक तरतूद करावी, तसेच रात्रीच्या वेळी अपघात टाळण्यासाठी विहिरींच्या परिसरात रेडियम पट्ट्या आणि इशारा फलक लावावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, या विषयावर राज्य शासनाने गांभीयार्ने विचार करून लवकरात लवकर शास्त्रोक्त आणि पर्यावरणपूरक धोरण जाहीर करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

“राज्यातील सर्व विहिरींचे ह्यसुरक्षा ऑडिटह्ण करून रिस्क मॅपिंग करणे, प्रत्येक विहिरीभोवती किमान चार फूट उंच संरक्षक भिंत व लोखंडी जाळी बसवणे, तसेच वनक्षेत्रालगतच्या विहिरींमध्ये वन्यजीवांसाठी ह्यएस्केप रॅम्पह्ण तयार करून विकास आणि पर्यावरणीय संतुलन यांचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे. उघड्या विहिरी आज मानवी आणि वन्यजीवांसाठी अदृश्य मृत्यू सापळे ठरत आहेत. त्यामुळे त्यांचे संरक्षण आणि सुरक्षिततेसाठी एकात्मिक धोरण आवश्यक आहे.”
**-डॉ. प्रशांत रवींद्र सिनकर, पर्यावरण अभ्यासक**

# मुंबईत ३० कोटींच्या ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश
## अवघ्या १३ हजारांच्या खोलीत सुरू होती एमडीची फॅक्टरी

**सुरक्षा यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह!**
इतका मोठा गुन्हेगारी इतिहास असलेला आरोपी पोलिसांच्या डोळ्यादेखत मुंबईत सक्रिय राहिलाच कसा? हा आता तपासाचा मुख्य विषय ठरला आहे. सध्या पोलीस केवळ आरोपींच्या अटकेवर न थांबता, या अमली पदार्थांच्या व्यवसायातील संपूर्ण 'सप्लाय चेन' (पुरवठा साखळी) उद्धवस्त करण्याच्या तयारीत आहेत. या रॅकेटमध्ये गुंतलेले इतर पडद्यामागचे सूत्रधार आणि त्यांना मदत करणारे स्थानिक दुवे शोधण्यासाठी पोलिसांनी विशेष पथके तैनात केली आहेत. आगामी काळात या प्रकरणात आणखी काही धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता आहे.




■ **मुंबई। प्रतिनिधी,**

महानगरातील अंधेरी परिसरातून ड्रग्ज तस्करीचा एक थक्क करणारा प्रकार समोर आला आहे. सहार रोडवरील अवघ्या १३ हजार रुपये भाड्याच्या एका छोट्याशा खोलीत तब्बल ३० कोटी रुपयांच्या 'एमडी' (सिंथेटिक ड्रग्ज) निर्मितीचा कारखाना सुरू असल्याचे पोलिसांनी उघडकीस आणले आहे. या कारवाईमुळे मुंबईतील ड्रग्ज तस्करीचे जाळे किती खोलवर पसरले आहे, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी पोलिसांनी मोहम्मद आरिफ मोहम्मद इलियास शेख (४४) या कुख्यात तस्कराला अटक केली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, आरोपी आरिफ हा यापूर्वी गुजरात पोलिसांच्या ताब्यातून फरार झाला होता आणि गेल्या काही काळापासून मुंबईत नाव बदलून सक्रिय होता. या छोट्या खोलीत त्याने अत्याधुनिक यंत्रणा बसवून मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थांचे उत्पादन आणि पुरवठा सुरू केला होता. पोलिसांनी या छाप्यात मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त केला असून, या रॅकेटमध्ये अजून कोणाचे हात गुंतले आहेत याचा तपास सुरू आहे.

**भास्कर चाळीतील 'त्या' खोलीत काय चालायचे?**

एका साध्या चाळीतून चालणाऱ्या कोट्यवधींच्या काळ्या धंद्याचा पोलिसांनी पदार्फाश केला आहे. भास्कर चाळीत अवघ्या १३ हजार रुपये भाड्याने घेतलेल्या एका खोलीत चक्क एमडी ड्रग्जची फॅक्टरी चालवली जात होती. अत्यंत साध्या सेटअपमध्ये हे अमली पदार्थ तयार केले जात असल्याने कोणालाही याचा संशय आला नाही. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपी अत्यंत हुशारीने हे रॅकेट चालवत होता. स्थानिक पातळीवर संशय येऊ नये म्हणून त्याने आजूबाजूच्या परिसरात ड्रग्जची विक्री पूर्णपणे टाळली होती. त्याऐवजी, बाहेरील नेटवर्कच्या माध्यमातून या ड्रग्जचा पुरवठा केला जात असे. एका लहानशा खोलीतून दरमहा २५ ते ३० कोटी रुपयांच्या ड्रग्जची निर्मिती केली जात असल्याचे उघड झाले असून, या मोठ्या रॅकेटच्या जाळ्याचा आता पोलीस कसून तपास करत आहेत.

एका संशयास्पद हालचालीने उघडले फॅक्टरीचे गुपित खार पोलिसांच्या नियमित गस्तीदरम्यान एका संशयित हालचालीने ड्रग्ज माफियांना मोठा हादरा दिला आहे. खार पोलिसांनी गस्त घालत असताना एका इसमाला संशयास्पदरित्या फिरताना पाहिले आणि त्याला ताब्यात घेतले. सुरुवातीला साध्या वाटणाऱ्या या कारवाईतून पुढे एका भव्य ड्रग्ज रॅकेटचा पदार्फाश झाला. पोलिसांनी जेव्हा आरोपीची झडती घेतली, तेव्हा त्याच्याकडे १५.४४ ग्रॅम एमडी ड्रग्ज आणि एक मोबाईल सापडला. पोलिसांनी खाक्या दाखवताच आरोपीने पोपटासारखे बोलायला सुरुवात केली, ज्यातून अंधेरीतील त्या 'सिक्रेट' फॅक्टरीची माहिती समोर आली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ अंधेरीतील खोलीवर छापा टाकला. या कारवाईत ड्रग्ज तयार करण्यासाठी लागणारी घातक रसायने आणि आधुनिक उपकरणे जप्त करण्यात आली आहेत. एका छोट्याशा धाग्यावरून पोलिसांनी थेट ड्रग्ज निर्मितीच्या केंद्रापर्यंत पोहोचण्यात यश मिळवले आहे

प्रतापगडमधून मुख्य साथीदाराला बेड्या या रॅकेटमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारा मुख्य आरोपीचा साथीदार रिजवान अहमद लियाकत अली याला उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथून अटक करण्यात आली आहे. या अटकेमुळे हे ड्रग्ज नेटवर्क केवळ मुंबईपुरते मर्यादित नसून त्याचे जाळे देशभर पसरल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंबईत ड्रग्ज तयार केल्यानंतर त्याच्या वितरणात आणि रॅकेटच्या विस्तारात रिजवानचा मोठा हात असल्याचा संशय पोलिसांना आहे. उत्तर प्रदेशातून झालेल्या या कारवाईमुळे आता अनेक मोठे खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हे नेटवर्क अजून किती राज्यांमध्ये सक्रिय आहे आणि यामध्ये आणखी कोणाचे पाठबळ आहे, याचा शोध आता पोलीस घेत आहेत.

पोलिसांकडून बँक खात्यातील २६ लाख गोठवले मुख्य आरोपी मोहम्मद आरिफ शेख याच्या या काळ्या धंद्यात त्याची पत्नी नसरीन ही देखील सक्रिय सहभागी असल्याचे तपासात उघड झाले आहे. ड्रग्ज विक्रीतून येणाऱ्या लाखो रुपयांच्या व्यवहारांचा आणि हिशोबाचा संपूर्ण ताबा नसरीनकडे होता. पोलिसांनी या कारवाईत तत्परता दाखवत नसरीनच्या बँक खात्यातील २६ लाख रुपयांची रक्कम गोठवली आहे. तपासादरम्यान मुख्य आरोपी आरिफची गुन्हेगारी कुंडलीही समोर आली आहे. आरिफ हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर १५ पेक्षा जास्त गंभीर गुन्हे नोंदवलेले आहेत. विशेष म्हणजे, गुजरात मधील एका ड्रग्ज प्रकरणात त्याला १० वर्षांची सक्तमजुरी सुनावण्यात आली होती. मात्र, २०२३ मध्ये पॅरोलवर बाहेर आल्यानंतर त्याने पोलिसांना गुंगारा दिला आणि मुंबईत येऊन पुन्हा ड्रग्जचे साम्राज्य उभे केले. आता पती-पत्नी दोघेही पोलिसांच्या रडारवर असून या रॅकेटची पाळेमुळे खोदली जात आहेत.

“हे प्रकरण अत्यंत धक्कादायक असून आरोपीने सरकारी यंत्रणेच्या नावाचा गैरवापर करत नागरिकांचा विश्वासघात केला आहे. आरोपीकडून जप्त करण्यात आलेले साहित्य आणि डिजिटल पुरावे तपासात महत्त्वाची भूमिका बजावतील. या रॅकेटमागील इतर व्यक्तींनाही लवकरच समोर आणले जाईल.”
**-सचिन गोरे, पोलीस उपायुक्त-परिमंडळ ४**

# बनावट सीबीआय अधिकारी अखेर जाळ्यात
## उल्हासनगरात ‘स्पेशल २६’ स्टाईल फसवणूक उघड

■ **उल्हासनगर। प्रतिनिधी,**

‘सीबीआय अधिकारी’ असल्याचा बनाव, कमरेला बनावट पिस्तूल, हातात वॉकी-टॉकी आणि सोबत तरुणांची टीम घेऊन हॉटेल्सवर धाडसत्र राबवणाऱ्या भामट्याचा अखेर भंडाफोड झाला आहे.

ठाणे जिल्ह्यात गेली पाच वर्षे सुरू असलेल्या या थरारक फसवणूक प्रकरणाने ह्यस्पेशल २६ह्ण या चित्रपटाची आठवण करून दिली आहे. राजू पाटेकर नावाच्या आरोपीने बेरोजगार तरुणांना सीबीआयमध्ये नोकरीचे आमिष दाखवत लाखो रुपये उकळले, तसेच त्यांना बनावट ‘अंडरकव्हर ऑपरेशन’मध्ये सहभागी करून घेतले. अखेर विठ्ठलवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल करत या बनावट साम्राज्यावर कारवाई सुरू केली आहे.

ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांच्या



मार्गदर्शनाखाली विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कोळी आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) चंद्रहार गोडसे यांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला. विठ्ठलवाडी पोलिसांच्या तपासात समोर आले की, आरोपी राजू पाटेकर हा स्वतःला सीबीआय अधिकारी म्हणून सादर करत होता.

हॉटेल्स, जीन्स कारखाने आणि विविध व्यावसायिक आस्थापनांवर अचानक धाड टाकत तो अधिकृत तपास सुरू असल्याचे भासवत असे. त्याच्या सोबत असलेले तरुणही स्वतःला सरकारी पथकाचा भाग समजून या कारवायांमध्ये सहभागी होत होते. प्रत्यक्षात मात्र या सर्व धाडी बनावट असल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले आहे.

आरोपीने ५० हून अधिक सुशिक्षित बेरोजगार तरुणांना नोकरीच्या आमिषाने आपल्या जाळ्यात ओढले. ‘सीबीआयमध्ये भरती’ आणि ‘गुप्त प्रशिक्षण’ देण्याच्या नावाखाली त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर पैसे उकळले गेले. या तरुणांना ह्यअंडरकव्हर मिशनह्णचा भाग असल्याचे सांगून त्यांच्याकडून घरगुती कामे करून घेण्यात येत होती, तसेच बनावट धाडीत सहभागी करून घेतले जात होते. सीबीआयचे बनावट ओळखपत्र, ‘राजमुद्रा’ बॅच, केरळ पोलीस शैलीतील चिन्हे, चिप असलेले आयडी कार्ड, वॉकी-टॉकी सेट, एअर गन आणि अनेक सिमकार्डचा समावेश आहे. याशिवाय ‘क्राइम ब्युरो इन्व्हेस्टिगेशन ट्रस्ट’ नावाच्या बनावट संस्थेचे कागदपत्रेही सापडली आहेत.

# लग्नाचे आमिष, बलात्कार अन् गर्भपात...
## कॉन्ट्रॅक्टरने महिला बँक कर्मचाऱ्याला 'असं' अडकवलं जाळ्यात

■ **नवी मुंबई। प्रतिनिधी,**

एका कंत्राटदाराने बँक कर्मचारी तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर वारंवार बलात्कार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आरोपीने तरुणीला घरी नेऊन आपल्या कुटुंबाशीही भेट घडवून आणली होती, मात्र जानेवारी 2026 मध्ये त्याने दुबईत दुसऱ्याच तरुणीशी साखरपुडा केल्याचे उघड झाले. पीडितेने याला विरोध केला असता, आरोपीने 26 फेब्रुवारी रोजी तिच्या घरात घुसून मारहाण केली आणि तक्रार केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी कंत्राटदाराच्या भावावरही धमकावल्याचा आरोप आहे. उत्तर प्रदेशातील नोएडा परिसरातील ही घटना आहे.

या प्रकरणातील धक्कादायक बाब म्हणजे, लग्नाचे आश्वासन देऊन आरोपीने गेल्या अडीच वर्षांत पीडितेवर अनेकदा अत्याचार केले, ज्यामुळे ती एकदा गर्भवती देखील राहिली होती. लग्नासाठी तगादा लावला असता आरोपीने कामाचे कारण सांगून टाळाटाळ केली आणि पीडितेचा जबरदस्तीने गर्भपातही घडवून आणला. पोलिसांच्या असहकार्यामुळे हताश झालेली पीडिता आता थेट पोलीस आयुक्तांकडे दाद मागणार आहे.

दरम्यान, या प्रकरणी डीसीपी (महिला सुरक्षा) अनुकृति शर्मा यांनी हस्तक्षेप केला असून संबंधित पोलीस ठाण्याच्या प्रमुखांना तात्काळ कारवाईचे आदेश दिले आहेत. पोलिसांच्या तपासात निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे आश्वासन त्यांनी दिले आहे. तरीही महिनाभर तक्रार प्रलंबित राहिल्याने स्थानिक पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानंतर या गंभीर प्रकरणात काय कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**गुन्हा नोंदवण्यासाठी पोलिसांची टाळाटाळ**
पीडितेचा असा दावा आहे की, आरोपीच्या वडिलांची मोठी राजकीय पार्श्वभूमी असून पोलीस कर्मचाऱ्यांशी असलेल्या संबंधांमुळे पोलीस गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करत आहेत. गेल्या एका महिन्यापासून पीडित तरुणी आणि तिचे नातेवाईक पोलीसांचे आणि डीसीपी कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहेत. या विलंबाचा फायदा घेत महत्त्वाचे सीसीटीव्ही फुटेज आता नष्ट झाले आहेत, परंतु मोबाईल चॅट्स आणि सीडीआर (कॉल डिटेल रेकॉर्ड्स) यांसारखे पुरावे अद्याप उपलब्ध असल्याचे तरुणीने सांगितले आहे.

# 22 वर्षीय विद्यार्थिनीवर पुलाखाली गँगरेप
## पोलिसांनी पीडितेलाच 3 दिवस बसवले पोलिस स्टेशनमध्ये

**पीडितेला पोलिस ठाण्यात ठेवले डांबून**
या गंभीर प्रकरणात पीडितेने पोलिसांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. ग्रामस्थांनी पोलिसांना माहिती दिल्यानंतर पोलिसांनी पीडिता आणि आरोपीला ताब्यात घेतले, मात्र एफआयआर नोंदवण्याऐवजी किंवा वैद्यकीय तपासणी करण्याऐवजी पोलिसांनी पीडितेला तब्बल तीन दिवस पोलीस ठाण्यातच डांबून ठेवले. इतकेच नाही तर, 'आरोपीसोबत तुझे चार वर्षांपासून प्रेमसंबंध होते,' असा खोटा जबाब देण्यासाठी पोलीस तिची मानसिक छळवणूक करत असल्याचा आरोपही पीडितेने केला आहे. संशयास्पद रित्या पोलिसांनी आरोपी राहुलला सोडून दिले आणि पीडितेला गढवा येथील आश्रयगृहात पाठवून दिले.

■ **मुंबई । प्रतिनिधी,**

एका 22 वर्षीय तरुणीवर पिस्तूलाचा धाक दाखवून बलात्कार केल्याची आणि त्यानंतर बळजबरीने लग्नाचे नाटक करुन सामूहिक बलात्कार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पीडित तरुणी घरापासून लांब राहून शिक्षण घेते. त्याठिकाणी शेजारी राहणाऱ्या राहुल चौधरी या 18 वर्षीय तरुणाने तिला एकटी पाहून पिस्तूलाचा धाक दाखवून अत्याचार केला. यावेळी तिला लग्नाचे आश्वासन देऊन शांत केले. या घटनेनंतर घाबरलेली तरुणी आपल्या मूळ गावी परतली. झारखंडच्या गढवा परिसरातील ही घटना आहे.

**नदीच्या पुलाखाली सामूहिक बलात्कार**

ही भयानक घटना येथेच थांबली नाही. 4 एप्रिल रोजी पीडितेचे पालक घरी नसताना आरोपी राहुल चौधरी आणि त्याचा मेहुणा आलोक चौधरी यांनी तरुणीचे अपहरण केले. तिला पलामू जिल्ह्यातील विश्रामपूर येथे नेऊन, आरोपीच्या बहिणीच्या उपस्थितीत जबरदस्तीने सिंदूर भरून लग्नाचा बनाव रचला. त्यानंतर तिला पुन्हा तिच्या गावी घेऊन जाताना वाटेत गढवा शाहपूर मार्गावरील तहले नदीच्या पुलाखाली नेऊन, राहुल आणि त्याच्या मेहुण्याने तरुणीवर सामूहिक बलात्कार केला. गावी पोहोचल्यावर संतापलेल्या ग्रामस्थांनी त्यांना घेराव घातला, तेव्हा आरोपीचा मेहुणा पळून गेला, परंतु राहुल पोलिसांच्या ताब्यात सापडला.



**पीडितेची विधी प्राधिकरणाकडे धाव**

न्यायासाठी आता पीडितेने जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे धाव घेतली असून, आरोपींवर कठोर कारवाई करण्याची आणि स्वतःच्या सुरक्षेची मागणी केली आहे. तिचे मोबाईल फोनही आरोपींनी फोडले असून, ते पोलिसांच्या ताब्यात आहेत. पोलीस प्रशासनाने मात्र सुरुवातीच्या तपासात हे प्रेमप्रकरणाचे प्रकरण असल्याचे सांगत अधिकृत कारवाईचे आश्वासन दिले आहे. या प्रकरणातील पोलीस अधिकाऱ्यांच्या संदिग्ध भूमिकेमुळे 'वदीर्ला लागलेला हा डाग' धुवून काढण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर उभे राहिले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com